"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार"

- शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे

**Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha, Kolhapur**

# Dattajirao Kadam Arts, Science and Commerce College, Ichalkaranji

# LIBRARY

## Newspaper Clippings

## 2021-22 – PART 1

दै. सकाळ २ एप्रिल २०२१

# 'डीकेएससी'मध्ये जॉब फेअर

सकाळ वृत्तसेवा

इचलकरंजी ता. १ : डीकेएएससी महाविद्यालयात करिअर केअर यांच्यावतीने जॉब फेअरचे आयोजन केले. सहभागी विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा व मुलाखती घेऊन निवड प्रक्रिया पूर्ण केली. प्रास्ताविक समन्वयक डॉ. डी. जे. घोडके यांनी केले. अध्यक्षस्थानी प्रा. डी. ए. यादव होते. प्रा. अक्षय स्वामी, प्रा. संजय पाटील, प्रा. चेतन पाटील, प्रा. कविता उपासे, प्रा. श्रध्दा कुलकर्णी, प्रा. विजय सुर्यवंशी यासह विद्यार्थी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

सकाळ

# 'डीकेएएससी'तर्फे आवाहन

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयातील प्रथम वर्षातील ज्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी केली आहे. अशा विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयाच्या वतीने नवीन लिंक तयार करून परीक्षेसंबंधी आवश्यक माहिती भरणे अनिवार्य केले आहे. शनिवारी (ता. ८) विद्यार्थ्यांची ऑनलाईन सराव परीक्षा घेण्यात येणार आहे. महाविद्यालयाच्या लिंकवर आवश्यक ती माहिती भरून सर्व सूचना उपलब्ध केलेल्या आहेत. बीए, बी. कॉम, बीएस्सी, बीसीए अशा सर्व प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन केले आहे.

Kolhapur, Gadhinglaj-Today
08/05/2021 Page No. 2

सकाळ

# डीकेएएससी महाविद्यालयात राष्ट्रीय कार्यशाळेस प्रतिसाद

इचलकरंजी, ता. १८ : डीकेएएससी महाविद्यालयात समाजशास्त्र विभागातर्फे समकालीन समाजशास्त्रे विचारवंतांचे योगदान या विषयावर ऑनलाईन राष्ट्रीय कार्यशाळा झाली. दहा दिवसांच्या राष्ट्रीय कार्यशाळेस संपूर्ण देशातून प्रतिसाद मिळाला. देशातील दहा तज्ज्ञ अभ्यासकांनी विविध विचारवंतांवर अभ्यासपूर्ण मांडणी करून त्यांच्या सिध्दांताचा संबंध वर्तमान जगाशी जोडता येईल यादृष्टीने विचार मांडले.

डॉ. सुकांत चौधरी (लखनौ), मधुरा जोशी (पुणे),डॉ. एम. टी. जोसेफ (मुंबई), डॉ. राजेश मिश्रा (लखनौ), डॉ. वैशाली जोशी (पुणे), डॉ. मच्छिंद्र सकटे (कोल्हापूर), डॉ. गीता चड्ढा (मुंबई), डॉ. नागेश शेळके (अहमदनगर), डॉ. श्वेता प्रसाद (वाराणसी), डॉ. रमेश कांबळे (मुंबई) या तज्ज्ञ अभ्यासकांनी समाजशास्त्र विचारवंतांनी मांडलेल्या सिद्धांताची अभ्यासपूर्ण मांडणी केली. एअरविंग गौफमन, युर्गेन हाबरमास, फेडरीक जेम्सन, पियर बुर्दुय, आंतोनिओ ग्राम्सी, अँथनी गीडन्स, मिशेल फुको, उलरीश बेक या समाजशास्त्रातील विचारवंतांचे योगदान अभ्यासकांनी स्पष्ट केले. उत्तर आधुनिकतावाद, उत्तर संरचनावाद, प्रतीकात्मक आंतरक्रिया, जीवनजगत, अस्तित्वाची अर्थव्यवस्था, सांस्कृतिक वर्चस्ववाद, व्यक्ती आणि समाज संबंध, सत्य, सत्ता आणि नितीशास्त्र, जागतिकीकरण, अभासी जग, शोषिक व प्रगत जग असे अनेक सिध्दांत व्याख्यातांनी मांडले. प्रत्येक विचारवंतानी या सिध्दांताचा वर्तमान जगाशी कसा संबंध जोडता येईल, या विषयी प्रकर्षाने विचार व्यक्त केले.

कार्यशाळेत समाजशास्त्राचे अभ्यासक, प्राध्यापक, संशोधक, विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यशाळेसाठी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांचे मार्गदर्शन लाभले. समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. अर्जुन जाधव यांनी कार्यशाळेचे नियोजन केले. डॉ. रूपाली सांभारे, प्रा. मयुरेश पाटील आदी प्राध्यापकांचे सहकार्य लाभले.

Kolhapur, Gadhinglaj-Today
19/05/2021 Page No. 2

लोकमत

# कर्तृत्वसंपन्न जीवनपटाची उकल

**विश्वाचा व्यापक अनुभव** मांडणाऱ्या खानदेशातील कवयित्री म्हणजे बहिणाबाई चौधरी. त्यांचे सर्व काव्ये त्यांचा मुलगा सोपानदेव चौधरी यांनी 'बहिणाबाईंची गाणी' या नावाने प्रकाशित केली आहेत. या कवितेंचा चिकित्सकपणे अभ्यास करून एका कर्तृत्वसंपन्न बहिणाबाईंचा जीवनपट डॉ. चंद्रकांत पोतदार यांनी 'सृजनगंध'मध्ये मांडला आहे. या पुस्तकाला अहमदनगर येथील ऋतुप्रकाशनने २०२० साली प्रकाशित केले आहे.



बहिणाबाईचे जीवन घर, प्रपंच यांमध्येच व्यतीत झालेले आहे. कौटुंबिक दैनंदिन काम करण्याच्या वृत्तीतच आपला देव शोधावा असे बहिणाबाईंनी सांगितले. श्रध्दाभाव, भक्तीभाव यातून फुलणारी बहिणाबाईचीकविता आहे. बहिणाबाईच्या कविता कृषिपरंपरेचे भान असणाऱ्या असून कवितेत गावगाडयाची, शेतकऱ्यांची बोली भाषा, प्रतिमा आलेल्या आहेत. मातीच्या, संस्कृतीच्या श्रेष्ठत्वाची बाजूत्यांनी कवितेतून मांडली आहे ग्रामीण संवेदना अभिव्यक्त करणारी बहिणाबाईची कविता असून निसर्ग निरीक्षणातून माणसाला नैतिकतेची शिकवण त्या देतात. अशिक्षित असून अनुभवातून बहिणाबाईंनी जीवनाचे अनमोल तत्वज्ञान सांगितले आहे. म्हणी, सुभाषिते, अध्यात्म, निसर्ग, जीवनरहाटी या माध्यमातून विचार सौंदर्य मांडले आहे. माणसाच्या जगण्या-मरण्यातला फरक तो फक्त एका श्वासाचा असतो हे सुंदरतत्वज्ञान सोप्या भाषेत बहिणाबाई सांगतात.

बहिणाबाईच्या कवितेत व्यक्त झालेली स्त्री प्राप्रंचिकतेत रमणारी, माहेरच्या आठवणींनी व्याकूळ होणारी आहे. अरे संसार संसार' या कवितेतून संसारी जीवनाच संपूर्ण तत्वज्ञानच व्यक्त होते. निरक्षर बहिणाबाईनी चुकीच्या चाली रीती, रुढी परंपरा, कर्मकांडे अशा अनिष्ट प्रथा मोडून काढण्यासाठी, नीतीमत्ता हरवलेल्या माणसाला खडे बोल सुनावतात. बहिणाबाईच्या कवितेचे आकलन करुन घेताना त्यांच्या कवितेतून आलेले सामाजिक, कौटुंबिक, सांस्कृतिक विषय, प्रभावी आशय मांडणी, अहिराणी भाषेची सोज्वळता, बहुश्रतपणा, वैचारिकता अशी अनेक वैशिष्टये अभ्यासाअंती अधोरेखित केलेली आढळतात. संशोधनाच्या अंगाने बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेचा केलेला हा अभ्यास 'सृजनगंध' या समीक्षाग्रंथाच्या रुपाने अभ्यासक, संशोधकांना दिशा देणारा ठरेल.

**- डॉ. चंद्रकांत आळवेकर**

(लेखक इचलकरंजीतील ए.एस.सी. कॉलेजमध्ये मराठी विभाग प्रमुख आहेत.)

Kolhapur Main
Page No. 9 May 23, 2021
Powered by: erelego.com

सकाळ

# डीकेएएससी महाविद्यालयात कार्यशाळा

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागातर्फे पुरुषसत्ता आणि लिंगभाव: स्त्रीवादी विचारवंतांची ओळख या विषयावर पाच दिवसांच्या ऑनलाइन राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. कार्यशाळेत व्याख्यानाचे पहिले पुष्प मुंबई येथील डॉ. मीना गोपाल यांनी गुंफले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. डॉ. गोपाळ यांनी सामाजिक पुनरुत्पादन या विषयाची मांडणी केली. उत्पादित, पुनरुत्पादित, सामाजिक, घरगुती, सार्वजनिक व खासगी क्षेत्रातील श्रमिक, सामाजिक बांधिलकीतून केले जाणारे श्रम, श्रमविभागणी, कुशल, अकुशल श्रमिक, श्रममूल्यांसाठींचा संघर्ष अशा मुद्यांची चर्चा स्त्रीवादी दृष्टिकोनातून केली. डॉ. अर्जुन जाधव यांनी प्रास्ताविक केले. कराड कॉलेजचे प्रा. विश्वनाथ सुतार यांनी आभार मानले.

Kolhapur, Gadhinglaj-Today
24/05/2021 Page No. 2

सकाळ

# 'डीकेएससी'मध्ये ब्लॅक फेमिनिझमवर व्याख्यान

इचलकरंजी, ता. २३ : डीकेएससी महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागातर्फे स्त्रीवादावर कार्यशाळा पार पडली. ऑनलाइन कार्यशाळेत जम्मू विद्यापीठातील प्रोफेसर डॉ. विश्व रक्षा यांचे 'ब्लॅक फेमिनिझम' या विषयावर व्याख्यान झाले. विश्व रक्षा यांनी ब्लॅक फेमिनिझम ही संकल्पना स्पष्ट केली. केवळ स्त्री म्हणून नव्हे तर रंग, जाती अशा गोष्टीमुळेही समाजात वावरताना सामाजिक, आर्थिक, राजकीयस्तरावर स्त्रियांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते, असे विचार त्यांनी व्याख्यानातून मांडले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. डॉ. ए. पी. जाधव यांनी प्रास्ताविक केले. प्रा. मयूरेश पाटील यांनी आभार मानले.

Kolhapur, Gadhinglaj-Today
24/05/2021 Page No. 4

सकाळ

# 'डीकेएएससी'मध्ये निवृत्तीनिमित्त गौरव

**इचलकरंजी**, ता. १ : डीकेएएससी महाविद्यालयात प्राध्यापकांचा निवृत्तीनिमित्त गौरव समारंभ झाला. प्रा. एम. बी. सुरपुसे, प्रा. बी. डी. कदम, अशोक पाटील या गुरुदेव कार्यकर्त्यांचा सत्कार प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्या हस्ते करण्यात आला. निवृत्त प्राध्यापकांनी शैक्षणिक कार्यातील अनेक प्रसंग सांगत आठवणींना उजाळा दिला. प्रा. पी. एस. आवटे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रा. मेजर मोहन वीरकर यांनी मनोगत व्यक्त केले. या वेळी प्रा. विश्वंभर कुलकर्णी, प्रा. डी. सी. कांबळे, डॉ. डी. जी. घोडके, प्रा. शिरढोणे यांच्यासह कनिष्ठ व वरिष्ठ विभागातील प्राध्यापक उपस्थित होते.

Kolhapur, Gadhinglaj-Today
02/06/2021 Page No. 4

लोकमत

# 'नदीष्ट'- सजीव निर्जिवांचे निवेदन

**'नदीष्ट' ही मनोज बोरगावकर** यांची कादंबरी ग्रंथाली प्रकाशन, मुंबई यांनी २०१९ साली प्रकाशित केली. कादंबरीचे आशयद्रव्य नदी या घटकाभोवती स्थिराविले आहे. यात प्रथम पुरुषी निवेदन असून पोहण्याचा नाद असतो.'आपण नादिष्ट नाही तर नदीष्ट आहोत' असे सांगतो.

कादंबरीतील सगुणा, भिकाजी ही ठळकपणे ध्यानात राहणारी पात्रे परिस्थितीने, नशिबाने समाजापासून दूर फेकलेली असून त्यांच्या वाट्याला वेदना आलेल्या आहेत. सकीनाबी अत्यंत कुरूप भिकारीण ओळखीशी इमान राखून निवेदकाला चोरट्यांपासून वाचविते. तृतीयपंथी सगुणा आणि तिच्या आईची भेट घडवून आणावी असे निवेदकाला वाटते पण आपल्या कातडीबचावुवृत्तीमुळे ते करू शकलो नाही याची खंत असते. तृतीयपंथी मालाडी म्हणते," आमच नदीसारखचं आहे एकदा उगमापासून सुटलं की सुटलं पुन्हा परतून उगमाकडे येता येत नाही."



भिकारी भिकाजी सांगतो की, त्याच्या बहिणीला मांजराशी खेळण्याची सवय असते. आई म्हणते,' वांझ होशील. पोरीनी मांजराशी जास्त खेळू नये.' लग्नानंतर बहिणीला मूल झाले नाही. सासरी छळ झाल्याने ती आत्महत्या करते. त्यापासून भिकाजीला मांजराचा राग असतो. भिकाजीला पत्नी पटवून घेत नाही. दारूच्या नशेत अंथरुणात आलेले मांजर समजून स्वतःच्या मुलीला भिंतीवर फेकून देतो. त्याला शिक्षा होते. तो घरापासून तुटतो.

'नदिष्ट' या कादंबरीचा कथाभाग, आशय नदीच्या परिसरातील आहे. सर्वच पात्रे निवेदकाला नदीवर भेटतात. त्यामुळे त्यांची नदीबद्दलची निरीक्षणे पहायला मिळतात. निवेदक नदीला सजीव घटक (लिव्हिंग ऑरगॅनिझम) मानतो. नदी त्याला गर्भडोहासारखी वाटते. नदीतल्या अंजान (व्हर्जिन) जागेवरची वाळू आपल्याजवळच्या माणसाला दिली तर त्याची इच्छा पूर्ण होते.असा विश्वास बामनवाड व्यक्त करतो. पुरात पोहताना प्रवाहाला अजिबात विरोध न करता पोहत राहायचे. बुद्धिबळातल्या पटातल्या उंटाप्रमाणे तिरपे तिरपे जायचे. पुरात पोहण्याची ही शक्कल निवेदक सांगतो. महापुरामुळे पाण्याची पातळी वाढते. माशांचे अमाप पीक येते. शेतातल्या मातीत नदीच्या पाण्याचे गुणधर्म मिसळतात. यातून नदीची उपयोगिता ध्यानात येते. पूर्वी नदीत तांब्याची नाणी टाकली जायची. तांब्यामुळे पाणी निर्जंतुक होते. तीच नदीत नाणे टाकण्याची पद्धत आजही आढळते.

'नदीष्ट' या कादंबरीतून कादंबरीकाराने नदीच्या परिसरात भेटलेल्या प्रत्येक सजीव निर्जीव गोष्टीतून वाचकाला अंतर्मुख व्हायला लावले आहे. नदी या सार्वजनिक ठिकाणाबद्दलचे कादंबरीकाराचे सूक्ष्म आणि संवेदनशीलतेचे निरीक्षण हा कादंबरीचा गाभा आहे. कादंबरीतल्या निवेदकाप्रमाणे वाचकही समृद्ध होतो.

**- डॉ. चंद्रकांत आळवेकर**

(लेखक इचलकरंजीतील ए.एस.सी. कॉलेजमध्ये मराठी विभाग प्रमुख आहेत.)

Kolhapur Main
Page No. 11 Jun 06, 2021
Powered by: erelego.com

सकाळ

# इचलकरंजीत घरोघरी शिवस्वराज्य दिन

## कोरोनाच्या पार्श्वभूमीवर खबरदारी; अनेक घरांवर भगवे ध्वज; विविध उपक्रम

इचलकरंजी, ता. ६ : शहर व परिसरात शिवराज्याभिषेक दिन कोरोना नियमांचे पालन करत मोठ्या उत्साहात साजरा झाला. यंदा शिवराज्यभिषेक दिन सोहळा शिव स्वराज्य दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय शासनाने घेतल्याने आजच्या दिवसाला खास महत्त्व आले. शाळा महाविद्यालये बंद असले तरी ऑनलाईन पद्धतीने व्याख्यान, विविध उपक्रमाद्वारे शिवस्वराज्य दिन साजरा झाला. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर यंदा मोठ्या प्रमाणात घराघरांत शिवस्वराज्य दिन पहायला मिळाला. अनेक ठिकाणी घरावर भगवे ध्वज फडकविण्यात आले.

### घराघरांत शिवस्वराज्य दिन

कोरोनामुळे अनेकांनी सामूहिक शिवस्वराज्य दिन साजरा करण्याचे टाळले. घरावर भगवा ध्वज फडकवून शिवराज्यभिषेक सोहळा साजरा केला. घरीच शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले. शहरात घरांवर भगवे ध्वज फडकताना दिसले.

### इचलकरंजी नगरपरिषद

शिवतीर्थावरील छत्रपती महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास नगराध्यक्षा सौ. अलका स्वामी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून पुष्पवृष्टी केली. तसेच शिवाजी उद्यानातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन केले. मलाबादे चौकातील शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या फलकाचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण झाले. माजी आमदार सुरेश हाळवणकर, आमदार प्रकाश आवाडे, उपनगराध्यक्ष तानाजी पोवार, आदी उपस्थित होते.

### ताराराणी पक्ष कार्यालय

कार्यालयाच्या प्रांगणात शिवशक राजदंड स्वराज्य गुढी उभारली. गुढीचे पूजन आमदार प्रकाश आवाडे यांनी केले. त्यांच्या हस्ते शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला. प्रकाश दत्तवाडे, जिल्हा परिषद सदस्य राहुल आवाडे, प्रकाश सातपुते, विलास गाताडे आदी उपस्थित होते.

### व्यंकटेश महाविद्यालय

प्रा. अमीन बाणदार यांच्या हस्ते शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. उपस्थित सर्वांनी अभिवादन केले. या वेळी डॉ. देवेंद्र बिरनाळे, श्री. दाभोळे यासह राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी उपस्थित होते.

### मनसे कार्यालय

शहर कार्यालयात शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास गजानन जाधव यांच्याहस्ते पुष्पहार अर्पण केला. रवी गोंदकर, प्रताप पाटील, मनोहर जोशी, शहाजी भोसले, योगेश तिवारी, संदीप पाटील, महेश शेंडे आदी उपस्थित होते.



**इचलकरंजी : नगरपालिकेच्या वतीने शिव तीर्थावर शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.**

### जांभळी ग्रामपंचायत

सरपंच खंडू खिलारे यांच्याहस्ते शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात केला. उपसरपंच श्रीधर फारणे, कृष्णात चव्हाण, विजय चोकाके, फिरोज मुजावर, ग्रामविकास अधिकारी हेमंत जाधव आदी उपस्थित होते.

### कबनूर ग्रामपंचायत

कबनूर : येथे ग्रामपंचायतच्या वतीने ग्रामपंचायत कार्यालयासमोरील पटांगणात शिव स्वराज्य दिन'' उत्साहात झाला. ग्रामविकास अधिकारी बी. टी. कुंभार यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. ग्रामपंचायत सदस्य सैफ मुजावर यांच्याहस्ते श्री शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या प्रतिमेचे पूजन केले. स्वराज्य गुढीचे पूजन सरपंच शोभा पोवार व जिल्हा परिषद सदस्या विजयाताई पाटील यांनी केले. उपसरपंच सुधीर पाटील, ज्येष्ठ नेते बी. डी. पाटील, पंचगंगा सहकारी साखर कारखान्याचे संचालक प्रमोद पाटील, मराठा समाज अध्यक्ष प्रा. रवींद्र पाटील, बबन केटकाळे आदी उपस्थित होते. उपसरपंच सुधीर पाटील यांनी आभार मानले.

### हातकणंगले सकल मराठा समाज

**हातकणंगले** : छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांची जोपासणा करणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन हातकणंगले पोलिस स्टेशनच्या सहायक पोलिस निरीक्षक सीमा बडे यांनी केले. हातकणंगले सकल मराठा समाजाच्या वतीने श्री. शिवस्वराज्य दिनानिमित्त येथील पंचायत समिती आवारात आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. दीपक कुत्रूरे यांनी स्वागत केले. दयासागर मोरे यांनी प्रास्ताविक केले. सीमा बडे यांच्याहस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन केले. राजू सूर्यवंशी, नगरसेवक दीनानाथ मोरे, अभिजित लुगडे, माजी उपसरपंच चंद्रकांत जाधव, कृष्णात जाधव आदी उपस्थित होते.

### खोची ग्रामपंचायत

**खोची** : येथील ग्रामपंचायतीमध्ये शिवराज्याभिषेक दिन सोहळा विविध उपक्रमांनी साजरा केला. शिवशक राजदंड शिवस्वराज्य गुढी उभी करून शिवराज्याभिषेक सोहळा साजरा झाला. प्रतिमापूजन सरपंच जगदीश पाटील व उपसरपंच रोहिणी पाटील यांनी केले. सदस्य अभिजित चव्हाण, प्रमोद सूर्यवंशी, राजकुमार पाटील, प्रमोद गुरव, स्नेहा पाटील, पूनम गुरव, वैशाली वाघ, कमल ढाले आदी उपस्थित होते. सरपंच जगदीश पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

### किणी ग्रामपंचायत

घुणकी : किणी येथील ग्रामपंचायतीमध्ये शिवशक राजदंड स्वराज्य गुढीचे पूजन ग्रामपंचायत सदस्य रणजित निकम यांनी केले. उपसरपंच अशोक माळी, जिल्हा परिषद सदस्या पुष्पाताई आळतेकर, वारणा दूध संघाचे संचालक ॲड. एन. आर. पाटील आदी उपस्थित होते.

### घुणकी ग्रामपंचायत

येथील ग्रामपंचायतीमध्ये शिवशक राजदंड स्वराज्य गुढीचे पूजन सरपंच राजाक्का रासकर यांनी केले. वारणा दूध संघाचे संचालक राजवर्धन मोहिते, राष्ट्रीय पेयजलचे अध्यक्ष संभाजी पाटील, ग्रामपंचायत सदस्य अशोक जाधव आदी उपस्थित होते.

### चावरे ग्रामपंचायत

येथील ग्रामपंचायतीमध्ये शिवशक राजदंड स्वराज्य गुढीचे पूजन सरपंच शारदा गुरव, हातकणंगले तालुका खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष जगन्नाथ पाटील, वडगाव बाजार समितीचे संचालक बी. जी. बोराडे, वारणा साखर कारखान्याचे संचालक उदयसिंह पाटील आदींच्या उपस्थितीत झाले.

### नवे पारगाव ग्रामपंचायत

येथील ग्रामपंचायतीमध्ये शिवशक राजदंड स्वराज्य गुढीचे पूजन सरपंच प्रकाशराव देशमुख यांनी केले. उपसरपंच सुभदा पाटील, ग्राम विकास अधिकारी अंकुश गोरे आदी उपस्थित होते.

### डीकेएएससी कॉलेजमध्ये व्याख्यान

इतिहास विभागाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज समजून घेताना या विषयावर व्याख्यान झाले. शिवाजी महाराजांना एका चौकटीत न बसवता महाराजांचे सामाजिक, धार्मिक, आर्थिक, पर्यावरण, व्यापार याबाबतची दूरदृष्टी प्रत्येकाने अमलात आणणे गरजेचे असल्याचे प्रा. नीलेश वळकुंजे यांनी सांगितले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. प्रास्ताविक प्रा. अरुण कटकोळे यांनी केले. आभार प्रा. विशाल गोडबोले यांनी मानले.

### जुने पारगाव ग्रामपंचायत

येथील ग्रामपंचायतीमध्ये शिवशक राजदंड स्वराज्य गुढीचे पूजन सरपंच अरविंद पाटील व पोलिसपाटील इंद्रजित पाटील यांनी केले. उपसरपंच शांता हजाम, ग्राम विकास अधिकारी मोहन पाटील, तलाठी प्रधान भानसे उपस्थित होते.

### निलेवाडी ग्रामपंचायत

ग्रामपंचायतींमध्ये शिवस्वराज्य दिनानिमित्त शिवशक राजदंड स्वराज्य गुढीचे पूजन सरपंच वर्षा माने यांनी केले. उपसरपंच तानाजी जाधव, ग्राम विकास अधिकारी बोराडे, बाबासाहेब माने आदी उपस्थित होते.

### तळसंदे ग्रामपंचायत

येथील ग्रामपंचायतीमध्ये शिवस्वराज्य दिनानिमित्त शिवशक राजदंड स्वराज्य गुढीचे पूजन उपसरपंच सावित्री चव्हाण व ग्रामपंचायत सदस्य महेश कुंभार यांनी केले. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन सदस्य राजेंद्र शिंदे यांनी केले. सरपंच अमरसिंह पाटील, ग्रामपंचायत सदस्य संग्रामसिंह शिंदे, शिवाजी पाटील, सुधा कांबळे, ग्राम विकास अधिकारी व्ही. आर. चव्हाण उपस्थित होते.

### वाठार तर्फे वडगाव ग्रामपंचायत

येथे सरपंच तेजस्विनी वठारकर यांच्याहस्ते शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन, ग्रामदैवत हनुमान मंदिर चौकात ९१ फुटी भगव्या ध्वजाचे पूजन, उपसरपंच राहुल पोवार आदींच्या उपस्थितीत झाले.

### अंबप ग्रामपंचायत

येथील ग्रामपंचायतीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन सरपंच बी. एस. अंबपकर, उपसरपंच राजेंद्र माने यांनी केले. बाळासाहेब माने , कृष्णात गायकवाड, बंडा हिरवे, सागर डोंगरे, माधुरी कांबळे, सलमा मुल्ला, सोनाली जाधव उपस्थित होत्या.

### मनपाडळे ग्रामपंचायत

ग्रामपंचायतीमध्ये शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व स्वराज्यगुढी सरपंच रायबाराजे शिंदे यांच्या हस्ते, उपसरपंच उल्हास वाघमारे, ग्रामपंचायत सदस्य हंबीरराव शिंदे, संजय पाटील यांच्या उपस्थितीत झाले.

### पाडळी ग्रामपंचायत

ग्रामपंचायतीमध्ये शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व स्वराज्यगुढी सरपंच डॉ. विभाराणी पाटील यांच्या हस्ते झाले. उपसरपंच रवींद्र पाटील, प्रकाश पाटील, एन. वाय. पाटील, व्ही. बी. पाटील आदी उपस्थित होते.

### अंबपवाडी ग्रामपंचायत

ग्रामपंचायतीमध्ये शिवाजी महारांच्या प्रतिमेचे पूजन व स्वराज्यगुढी पूजन सदस्य मधुकर जाधव यांनी केले. सरपंच पार्वती नाईक, उपसरपंच बजरंग साबळे ,सर्व सदस्य व ग्रामसेवक लक्ष्मण पाटील उपस्थित होते.

### खोतवाडी ग्रामपंचायत

तारदाळ : खोतवाडी ग्रामपंचायतीमध्ये शिवराज्याभिषेक दिन उत्साहात झाला. ध्वजवंजन व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिषेक करून अभिवादन केले. यावेळी सरपंच संजय चोपडे, उपसरपंच सौ. विद्या शिंदे, ग्रा. पं. सदस्य गजानन नलगे, अनिल माने, सतिश जुगुळकर आदी उपस्थित होते.

### कुरुंदवाड पालिका

कुरुंदवाड : येथील पालिका व शिवतीर्थ येथे शिवराज्याभिषेक दिन साजरा केला. पालिकेत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला नगराध्यक्ष जयराम पाटील यांच्याहस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. मुख्याधिकारी निखिल जाधव, उपनगराध्यक्ष प्रा. सुनील चव्हाण, प्रफुल पाटील, दयानंद मालवेकर आदी उपस्थित होते. शिवतीर्थ येथे माजी नगराध्यक्ष वैभव उगळे, प्रफुल्ल पाटील यांच्याहस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. किरण भोसले, शिवतेज महाडिक, शुभम कुरणे, स्वप्नील गवळी आदी उपस्थित होते. येथील युवक आझाद मंडळातर्फे हनुमान मंदिरात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. दादासाहेब गवळी, वसंत संकपाळ, डी. वाय. चव्हाण आदी उपस्थित होते.

### नवे दानवाड ग्रामपंचायत

नवे दानवाड (ता. शिरोळ) येथे ग्रामपंचायतीच्यावतीने शिवस्वराज्य दिन उत्साहात साजरा केला. लोकनियुक्त सरपंच वंदना हरिश्चंद्र कांबळे यांनी स्वराज्य ध्वज व गुढी यास पुष्पहार अर्पण करून श्रीफळ वाढून पूजन केले. भगवा स्वराज ध्वज व गुढी यास उपस्थितांनी अभिवादन केले. उपसरपंच विष्णू कांबळे, ग्रा. पं. सदस्य शहानूर गवंडी, पांडुरंग धनगर, ग्रा. पं. सदस्या सौ. शोभाताई परीट आदी उपस्थित होते.

लोकमत

न्यूज Inbox

## ऑनलाईन व्याख्यान

इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये ' छत्रपती शिवाजी महाराज समजून घेताना ' या विषयावर नीलेश वळकुंजे यांचे ऑनलाईन व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी डॉ.व्ही.एस.ढेकळे होते. अरुण कटकोळे यांनी स्वागत केले. प्रा. विशाल गोडबोले यांनी आभार मानले.

Hello Kolhapur Gramin
Page No. 3 Jun 08, 2021
Powered by: erelego.com

लोकमत

# डॉ. बापूजी साळुंखे यांची जयंती साजरी

इचलकरंजी : डीकेएएसी कॉलेजमध्ये शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी प्रतिमेचे पूजन केले. डॉ. डी. सी. कांबळे यांनी प्रास्ताविक केले. मोहन वीरकर यांनी आभार मानले.

Hello Kolhapur Gramin
Page No. 3 Jun 10, 2021
Powered by: erelego.com

सकाळ

# डॉ. बापूजी साळुंखे म्हणजे फुले, गांधी, विवेकानंद यांच्या विचारांचे संमिश्रण

## डॉ. कोत्तापल्ले; १०३ व्या जयंतीनिमित्त ऑनलाईन कार्यक्रम



कोल्हापूर : विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या समाधिस्थळाला अभिवादन करताना डॉ. अभयकुमार साळुंखे व इतर.

कोल्हापूर, ता. ९ : महात्मा फुले, महात्मा गांधी आणि स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचे संमिश्रण म्हणजेच शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर, फुले आणि राजर्षी शाहू महाराज यांचे शिक्षणाचे कार्य पुढे नेण्याचे कार्य त्यांनी केले, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी केले.

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचा १०३ व्या जयंतीनिमित्त आयोजित ऑनलाईन कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे हे होते.

प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, 'बापूजींनी आपल्या कर्मयोगी आयुष्यात सत्य, शील, प्रामाणिकता, त्याग, पिळवणुकीस आळा आणि मानव्याचे अधिष्ठान जपत श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची उभारणी केली. सामान्य समाजात सुसंस्कारी शिक्षण प्रसाराच्या साधनेने समाजात परिवर्तन घडवून आणले.'

शिवाजी विद्यापीठाच्या परिसरातील डॉ. बापूजी साळुंखे यांच्या पुतळ्यास कुलगुरू डॉ. डी. टी.शिर्के यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. संस्थेचे सहसचिव (अर्थ) प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. संस्थेच्या सचिव प्राचार्या सौ. शुभांगी गावडे यांनी आभार मानले. प्रा. डॉ. महेश गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, संस्थेचे सहसचिव (प्रशासन) प्राचार्य डॉ. युवराज भोसले, हितेंद्र साळुंखे उपस्थित होते.

Kolhapur, Main
10/06/2021 Page No. 5




इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांची जयंती साजरी करण्यात आली.

# डॉ. बापूजी साळुंखेंना अभिवादन

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांची जयंती साजरी केली. प्राचार्य डॉ. व्ही. एच. ढेकळे यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. प्रास्ताविक डॉ. डी. सी. कांबळे यांनी केले. आभार प्रा. मेजर मोहन वीरकर यांनी मानले. प्रा. डी. ए. यादव यासह विद्यार्थी, प्राध्यापक उपस्थित होते.

# ज्ञानतपस्वी –डॉ. बापूजी साळुंखे



..९ जून १९१९रोजी सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील रामापूर या छोट्या गावात जन्मलेल्या बापूजी साळुंखे यांना अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी सामना करावा लागला. बालपणीच मातृ-पितृ सुखाला वंचित झालेले असताना एकाकी संघर्ष करीत त्यांनी जीवन प्रवासाला सुरुवात केली. गावातच प्राथमिक शिक्षण पूर्ण करून पुढे अध्यापनाला आवश्यक असलेले बीए ,बीटी पर्यंतचे शिक्षण घेतले पण त्याचवेळी देश स्वातंत्र्याची आस मनात असल्याने १९४२ च्या स्वातंत्र्य चळवळीत सहभाग घेतला .

समाजासाठी आपण सतत उपयोगी पडले पाहिजे, त्यांची सेवा केली पाहिजे या हेतूने त्यांनी शिक्षण सेवेचा प्रारंभ केला. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेत शिक्षक म्हणून ज्ञानदानाचे कार्य सुरू केले .पुढे ते त्या संस्थेत मुख्याध्यापकही झाले. रयत शिक्षण संस्थेतून बाहेर पडल्यानंतर शिक्षणप्रेमी मंडळींबरोबर विचार विनिमय करून नवीन शिक्षणसंस्था स्थापनेची संकल्पना मांडली. शिक्षणसंस्थेची गरज, उद्दिष्ट्ये समोर ठेवून 'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षण प्रसार' या ध्येयवादाने प्रेरित होऊन १९५४ साली डॉ. बापूजींनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्थेची स्थापना केली .शिक्षणाने मनुष्य ज्ञानी व्हावा. त्याचबरोबर तो सुसंस्कारी व्हावा यासाठी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी शिक्षणप्रसाराचे कार्य हाती घेतले. सत्य, प्रामाणिकपणा, चारित्र्य, पिळवणूक प्रवृत्तीस आळा,त्याग, सेवा व प्रेम या मानवी गुणांचे ज्ञान शिक्षणाद्वारे होऊन त्याद्वारे एक सुसंस्कारक्षम नागरिक निर्माण व्हावा अशी बापूजींची अपेक्षा होती .

महाराष्ट्र आणि कर्नाटक या राज्यांमध्ये अगदी प्राथमिक शिक्षणापासून पदव्युत्तर शिक्षणापर्यंतची अनेक संस्कारकेंद्रे उघडली .अत्यंत दुर्गम भागात शिक्षणाची गंगा पोहोचणे हे बापूजींच्या शिक्षण प्रसाराचे उद्दिष्ट होते .समाजाच्या शेवटच्या घटकांपर्यंत शिक्षण पोहोचवण्याचा संकल्प बापूजी साळुंखे यांच्या सारख्या अनेक शिक्षणव्रतींचा चाललेला होता.


बापूजी साळुंखे यांनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षणसंस्थेच्या माध्यमातून शिक्षणाची गरज ओळखून शिक्षणाचा उद्देश, सुसंस्काराचे महत्त्व समाजापर्यंत पोहोचविले. बापूजींचे शिक्षणसंस्था स्थापना वेळचे ध्येयवाक्य ,त्यांनी सांगितलेली पंचतत्वे ,संस्थेला त्यांनी दिलेली सर्वधर्मसमभावाची शिकवण देणारी प्रार्थना ,बापूजींचे शिक्षण विषयक विचार ,गुरूदेव कार्यकर्त्यांना त्यांनी वेळोवेळी दिलेला संदेश या सर्वगोष्टी आजही शिक्षणक्षेत्रासाठी मौल्यवान ठरतात. बापूजींच्या शिक्षणविषयक तत्त्वज्ञानाची शिक्षणक्षेत्राशी संबंधित सर्वानाच गरज आहे. डॉ. बापूजी साळुंखे यांच्या विचारांची सुसंगती पाहिली तर आजच्या निराश समाजमनाला बापूजींचे शिक्षणविषयक विचार समजून घ्यायचे असतील तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील विविध पैलूंचा अभ्यास डोळसपणे करण्याची आवश्यकता आहे. त्यानी शिक्षणविषयक सर्व समस्यांचा, शिक्षणक्षेत्राशी संबंधित सर्व घटकांचा, अनुभवातून अभ्यास केला होता. त्यांच्या शिक्षणविषयक विचारांची नाळ थोर तत्वचिंतक ,शिक्षणात मानवतावादी दृष्टीकोनाचे उदगाते स्वामी विवेकानंद यांच्या विचाराशीआहे हे स्पष्टपणे जाणवते.

आज डॉ. बापूजींनी घालून दिलेल्या पायवाटेने श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची वाटचाल सुरू आहे. संस्थेने अभियांत्रिकी आणि वैद्यकीय अशा विविध व्यावसायिक शिक्षणाची कवाडे उघडली आहेत. आज संस्थेचे अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रात उच्चपदावर सेवाव्रत जोपासतात. या सर्वामागे डॉ.बापूजी साळुंखे यांचा आशीर्वाद आणि प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्या सौ. शुभांगी गावडे यांची सततची कार्यमग्नता महत्त्वाची आहे. महाराष्ट्रातच नव्हे तर भारतातील शैक्षणिक इतिहासात एका तेजस्वी पर्वाचे जनक म्हणून बापूजी साळुंखे चिरंतन स्मरणात राहतील.

**शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन !**

**प्रा.डॉ.एकनाथ आळवेकर**
**मराठी विभागप्रमुख**
**डी.के.ए.एस.सी.कॉलेज,**
**इचलकरंजी.**

## दुचाकी वाहनांची नवी नोंदणी १६ जूनपासून



कोल्हापूर, दि. ११ (जिल्हा माहिती कार्यालय): खासगी दुचाकी वाहनांची जुनी नोंदणी मालिका **MH09-FT** दि. १५ जूनपर्यंत संपणे अपेक्षित आहे.

सकाळ

# घरीच योगासनातून योग दिन

## इचलकरंजीत अनेक शाळांकडून विद्यार्थ्यांना ऑनलाईन योगाचे धडे

इचलकरंजी, ता. २१ : शहर व परिसरात जागतिक योग दिन साजरा करण्यात आला. शाळा, महाविद्यालय, नगरपालिकेच्या वतीने कोरोनाचे नियम पाळत योग दिन झाला. काही शाळांनी ऑनलाईन पद्धतीने विद्यार्थ्यांना योगाचे धडे दिले. कोरोनामुळे यंदा दुसऱ्यांदा योग दिनावर मर्यादा आल्या. मोठ्या प्रमाणात सामुहिक योग दिन टाळून घरीच योगासने करत योग दिनाचे महत्त्व जपले.



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालय व नगरपरिषदेच्या वतीने योग भवन येथे जागतिक योग दिन साजरा करण्यात आला.

**डीकेएएससी महाविद्यालय व इचलकरंजी नगरपरिषद**

नगरपरिषदेच्या योग भवनमध्ये डीकेएएससी महाविद्यालयाचे एनसीसी व एनएसएस विभागाच्या सहकार्याने जागतिक योग दिन आयोजीत केला. योग प्रशिक्षक सुहास पोवळे, धनंजय लोंढे यांनी योग प्रात्यक्षिके करून दाखवली. प्राचार्य व्ही. एस. ढेकळे यांनी मनोगत व्यक्त केले. शहरात या कार्यक्रमाचा अनेकांनी ऑनलाईन पध्दतीने लाभ घेतला. प्रा. मेजर मोहन वीरकर यांनी नियोजन केले. प्रा. अरूण कटकोळे, रवीकुमार शर्मा, पांडुरंग मेटे, नगरसेवक युवराज माळी, राहुल पोटे आदी उपस्थित होते.

**आंतरभारती विद्यालय**

डी. एस. अथणे यांनी योग दिनाचे महत्त्व सांगून जीवनातील योगासनाची उपयोगिता सांगितली. क्रीडा शिक्षक बी. एस. गायकवाड यांनी विद्यार्थ्यांकडून प्रात्यक्षिके करून घेतली. मुख्याध्यापक एम. डी. पाटील, सौ. एस. ए. उतूरकर उपस्थित होते.

**गंगामाई गर्ल्स हायस्कूल**

श्रद्धा चावरे व सेजल सुतार या विद्यार्थिनींनी योगासने दाखवून विद्यार्थ्यांकडून करवून घेतली. कोरोनात योगाचे महत्त्व सांगत योगासने नियमित करणे गरजेचे असल्याचे मुख्याध्यापिका श्रीमती एस. एस. गोंदकर यांनी सांगितले. उपप्राचार्य आर. एस. पाटील, पर्यवेक्षिका सौ. एस. एस. भस्मे, व्ही. एन. कांबळे, क्रीडा विभागप्रमुख शेखर शहा उपस्थित होते.

**आम्ही जांभळीकर ग्रुप**

वृक्षसंवर्धनाबरोबर मानवी आरोग्य जपण्यासाठी ऑक्सिजन पार्कवर योग दिनानिमित्त कार्यक्रम झाला. श्री. बापूजी यांच्या मार्गदर्शनाखाली उपस्थितांनी योगासने केली. मानवी जीवनातील योगाचे महत्त्व समजावून सांगत जगण्याचा योग त्यांनी शिकविला. विजय रणखांबे यांनीही व्यायामाचे धडे दिले.

**ऑनलाईन योग दिन**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने विविध ठिकाणी ऑनलाईन पद्धतीने योग दिनाचे आयोजन केले. हेगडेवार रुग्णालय, आर्य चाणक्य पतसंस्था, माधव विद्यामंदिर या ठिकाणी ऑनलाईन योग दिन साजरा झाला. यासाठी डॉ. बाळकृष्ण होशिंग, अरविंद कुलकर्णी, मिलिंद कुलकर्णी, श्रीकांत प्रभूदेसाई, राजू व्हनुंगरे आदींनी परिश्रम घेतले. महाराष्ट्र सीए असोसिएशन, व्यंकटराव हायस्कूल येथही ऑनलाईन योग दिन साजरा झाला.

**हुतात्मा बाबूगेनू विद्यामंदिर**

जुना चंदूर रोडवर पै. अमृतमामा भोसले युवा शक्तीच्या माध्यमातून तरुणांनी योगासने केली. वयोवृध्द नागरिक तरुणांसह योग दिनात सहभागी झाले. तरुणांना केलेल्या आवाहनानुसार उत्स्फूर्तपणे तरुणांनी सहभाग घेतला.

लोकमत

# ऑनलाइन कार्यशाळा

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात एकदिवसीय ऑनलाइन कार्यशाळा झाली. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही.एस. ढेकळे होते. इतिहास विभागामार्फत 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज : जीवन व कार्य' या विषयावर कार्यशाळा झाली. डॉ. सुरेश शिखरे व ई.आर. मचाले यांनी शाहू महाराजांच्या सामाजिक कार्यावर विचार मांडले. प्रा. अरुण कटकोळे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. विशाल गोडबोले यांनी आभार मानले.

Kolhapur Main
Page No. 4 Jun 26, 2021
Powered by: erelego.com

लोकमत

# अभ्यासक्रमांना मंजुरी

इचलकरंजी : येथील डीकेएएससी कॉलेजमध्ये शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून एम.एस्सी. भाग १, एम.ए. भाग १, बी.एस्सी. भाग ३, बी.कॉम. भाग १ या नवीन अभ्यासक्रमांना मंजुरी मिळाली आहे. अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी प्रस्ताव तयार करून मंजुरी मिळविण्यासाठी संस्थेचे कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, प्राचार्या शुभांगी गावडे यांचे मार्गदर्शन मिळाले.

Kolhapur Main
Page No. 4 Jun 26, 2021
Powered by: erelego.com

सकाळ

# डीकेएएससी कॉलेजमध्ये व्याख्यान

**इचलकरंजी :** डीकेएएससी कॉलेजमध्ये जल साक्षरता या विषयावर ऑनलाईन व्याख्यान झाले. भूजल सर्वेक्षण विभाग कोल्हापूर व शिवाजी विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना व आयक्यूएसी अंतर्गत आयोजन केले. प्रा. आर. जी. संकपाळ यांनी भूजल साक्षरता आणि जलसाक्षरतेबाबत विचार मांडले. भूजल उपसा, पाणी टंचाईची कारणे, जलचक्र भूजल अधिनियम व जलसाक्षरता याबाबत मार्गदर्शन केले. प्रास्ताविक प्रा. डी. जे. मुंगारे यांनी केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. आभार प्रा. अरुण कटकोळे यांनी मानले.

Kolhapur, Gadhinglaj-Today
07/07/2021 Page No. 2

सकाळ

# 'डीकेएएससी'मध्ये कार्यशाळा

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात करिअर इन बँकींग ॲण्ड इन्शुरन्स या विषयावर कार्यशाळा झाली. स्पर्धा परीक्षा, वाणिज्य विभाग व विकास सावंत ॲकॅडमीच्यावतीने या कार्यशाळेचे आयोजन केले. स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी सकारात्मक दृष्टीकोन बाळगून बँकींग, विमा, स्टाफ सिलेक्शन परीक्षेची तयारी करावी, असे मार्गदर्शन विकास सावंत यांनी केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. डॉ. व्ही. व्ही. गाणबावले, डॉ. ए. पी. जाधव, डॉ. डी. जी. घोडके, प्रा. महाजन, प्रा. रोड्रिक्स आदी उपस्थित होते.

Kolhapur, Gadhinglaj-Today
10/07/2021 Page No. 2

# करियर इन बँकिंग अण्ड इन्शुरन्स या विषयावर कार्यशाळा संपन्न

इचलकरंजी – येथील दत्ताजीराव कदम आर्ट्स ,सायन्स अँड कॉमर्स कॉलेज व विकास सावंत अकॅडमी, मुंबई आयोजित महाविद्यालयातील वाणिज्य , स्पर्धा परीक्षा, आयक्यूएसी व प्लेसमेंट सेल विभाग यांच्या सहकार्याने 'करियर इन बँकिंग अण्ड इन्शुरन्स'या विषयावर ऑनलाईन कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेमध्ये श्री विकास सावंत व रोहित गोपटगार या प्रमुख मार्गदर्शकांनी मार्गदर्शन केले .श्री विकास सावंत यांनी स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचा दृष्टिकोन सकारात्मक असला पाहिजे याबद्दल सांगून बँकिंग, विमा, स्टाफ सिलेक्शन परीक्षेची पूर्वतयारी, व मुख्य परीक्षेच्या तयारी संबंधी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेचे अध्यक्ष प्रभारी प्राचार्य डॉ. व्हि. एस. ढेकळे म्हणाले, 'विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांच्या आव्हानाला सामोरे गेले पाहिजे'.

कार्यशाळेचे प्रास्ताविक वाणिज्य विभागाचे प्रा. व्ही.पी.पाटील यांनी केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख प्रा. अक्षय स्वामी यांनी करून दिली. आभार व सूत्रसंचालनाची जबाबदारी अतिश पाटील यांनी पार पाडली. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी डॉ.व्ही.व्ही.गानबावले ,डॉ.ए.पी. जाधव ,डॉ.डी.जी घोडके, प्रा. महाजन, प्रा. रॉड्रिक्स यांचे सहकार्य मिळाले. या कार्यशाळेमध्ये प्राध्यापक, विद्यार्थी सहभागी झाले होते.



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात तृतीय वर्षातील एनसीसी छात्र सैनिकांना प्रमाणपत्र वाटपप्रसंगी गजेंद्र लोहार, प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे, मेजर मोहन वीरकर आदी.

# छात्र सैनिकांना प्रमाणपत्र वाटप

**इचलकरंजी :** महाविद्यालयातील विद्यार्थी हा शेवटच्या क्षणापर्यंत विद्यार्थी म्हणून जगत असतो. आयुष्यात प्रत्येक व्यक्तीसमोर देशभक्ती आणि देशप्रेमाची भावना जागृत झाली पाहिजे. जीवन जगताना जीवन हे नियोजनबद्धच असायला हवे, असे मत सहायक पोलिस निरीक्षक गजेंद्र लोहार यांनी व्यक्त केले. डीकेएएससी महाविद्यालयात तृतीय वर्षातील एनसीसी छात्र सैनिकांना प्रमाणपत्र वाटपप्रसंगी ते बोलत होते. महाविद्यालयातील तृतीय वर्षातील छात्र सैनिकांना सी प्रमाणपत्र वाटप केले. तसेच द्वितीय वर्षातील उत्तम कामगिरी करणाऱ्या छात्रसैनिकांचा सत्कार केला. एनसीसी छात्रसैनिकांनी मनोगत व्यक्त केले.

सकाळ

# डीकेएएससी कॉलेजमध्ये व्याख्यान

**इचलकरंजी :** डीकेएएससी कॉलेजमध्ये सायबर क्राइम विषयावर ऑनलाईन व्याख्यान झाले. महाराष्ट्र विवेकवाहिनी आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर व्याख्यान झाले. वक्ते ॲड. समीर मुदगल यांनी सायबर क्राइम ''हॅकिंग, सायबर स्टाकिंग, इमेल फूकिंग'' पोर्नोग्राफी, सायबर थॉट, सेक्स टॉर्शन, गुन्हे त्यांच्या शिक्षा व यासंदर्भात उपाययोजनांबाबत माहीत देत सोशल मीडियाचा सकारात्मक विचार करा, असा संदेश दिला. प्रास्ताविक व परिचय प्रा. अरुण कटकोळे यांनी केला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. आभार प्रा. व्ही. पी. पाटील यांनी मानले. सूत्रसंचालन सौरभ पवार याने केले.

# डीकेएएससी महाविद्यालयाचे यश

**इचलकरंजी :** कोल्हापूर येथील न्यू कॉलेजमध्ये झालेल्या शिवाजी विद्यापीठाच्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवात डीकेएएससी महाविद्यालयाने यश प्राप्त केले. रुबिया मुल्ला हिने हिंदी वक्तृत्वमध्ये प्रथम, नागराज सुतार याने मातीकाम क्ले प्रकरात तृतीय, ओंकार शिरगुप्पे याने रांगोळी प्रकारात द्वितीय, प्रकाश कोळी याने नकला प्रकारात द्वितीय, सुचिता तारळेकर हिने कातरकाम कलाप्रकारात द्वितीय क्रमांक प्राप्त केला. यंदा प्रथमच वैयक्तिक कलाप्रकारात झालेल्या युवा महोत्सवात तब्बल सहा पारितोषिके महाविद्यालयाने पटकावली. यशस्वी विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे, सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. डॉ. डी. सी. कांबळे आदींचे मार्गदर्शन लाभले.

दै. ललकार... दि. 20 जुलै 2021

# यशस्वी जीवनासाठी कौशल्ये आवश्यक

## डॉ.व्हि.एस.ढेकळे

इचलकरंजी, दि.१९ (वार्ताहर) – येथील डी के ए एस सी महाविद्यालयात इंग्रजी विभागातर्फे एकविसाव्या शतकातील कौशल्य या विषयावर वेबिनार संपन्न झाला. या वेबिनारमध्ये तज्ञ मार्गदर्शक म्हणून डॉ.विश्वनाथ बिटे यांनी विद्यार्थ्यांना कौशल्य विकासाबद्दल मार्गदर्शन केले. यामध्ये त्यांनी सर्जनशीलता, श्रवणक्षमता, निर्णय क्षमता, सहसंबंध, संवाद कौशल्य, समस्या निराकरण, नेतृत्वगुण इत्यादी कौशल्यांचा विकास कशाप्रकारे करता येईल याविषयी उदाहरणासहित विद्यार्थ्यांना पटवून दिले. अध्यक्षस्थान ावरून बोलताना प्रभारी प्राचार्य डॉ. व्हि. एस. ढेकळे यांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी निरनिराळी कौशल्ये आत्मसात करण्याची गरज व्यक्त केली. प्रास्ताविक डॉ. डी.जी. घोडके यांनी केले. प्रमुख पाहुण्यांची ओळख इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. सुनिता वेल्हाळ यांनी करून दिली तर आभार प्रा. कु. नम्रता ताटे यांनी मानले.

सकाळ



इचलकरंजी : डीकेएएसी महाविद्यालयात शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचा स्मृतिदिन साजरा केला.

# डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिदिन

**इचलकरंजी :** डीकेएएसी महाविद्यालयात शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचा स्मृतिदिन साजरा केला. प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्या हस्ते डॉ. बापूजी साळुंखे यांच्या प्रतिमेचे पूजन केले. बापूजींच्या प्रार्थनेतील सर्वधर्म समभाव या विषयी प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर यांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. डॉ. डी. जी. घोडके यांनी प्रास्ताविक केले. प्रा. के. एम. गवळी यांनी आभार मानले. डी. एम. लोकरे, प्रा. मेजर मोहन वीरकर, प्रा. विश्वंभर कुलकर्णी, प्रा. डी. जे. मुंगारे, ए. एम. साठे उपस्थित होते.

Kolhapur, Gadhinglaj-Today
09/08/2021 Page No. 2

सकाळ

# डीकेएएससी महाविद्यालयात वेबिनार

इचलकरंजी, ता. १२ : डीकेएएससी महाविद्यालयात इंग्रजी विभागातर्फे 'एकविसाव्या शतकातील कौशल्य' या विषयावर वेबिनार झाला. यशस्वी जीवनासाठी कौशल्य अत्यंत गरजेचे असून, विविध कौशल्यांचा विकास उदाहरणांसहीत मार्गदर्शनातून डॉ. विश्वनाथ बिटे यांनी स्पष्ट केला. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. प्रा. नम्रता ताटे यांनी आभार मानले. डॉ. सुनीता वेल्हाळ, प्रा. हेमांगी वडेर आदी सहभागी झाले.

Kolhapur, Gadhinglaj-Today
13/08/2021 Page No. 2

सकाळ

# डॉ. मधुमती शिंदे यांचा गौरव



इचलकरंजी : खासदार धैर्यशील माने यांच्याकडून भारतज्योती प्रतिभासन्मान एक्सलन्स ॲवॉर्ड स्वीकारताना डॉ. मधुमती शिंदे.

इचलकरंजी : प्रा. डॉ. मधुमती शिंदे यांना राज्यस्तरीय भारतज्योती प्रतिभासन्मान एक्सलन्स ॲवॉर्ड मिळाले. येथील दत्ताजीराव कदम आर्टस्, सायन्स ॲंड कॉमर्स कॉलेजमधील वनस्पतीशास्त्र विभागात डॉ. मधुमती शिंदे प्राध्यापक म्हणून काम करतात. त्यांची पीएचडीधारक क्षेत्रातून २०२० मध्ये मनुष्यबळ लोकसेवा अकादमी 'राज्यस्तरीय भारतज्योती प्रतिभासन्मान एक्सलन्स ॲवॉर्ड गुणिजन गौरव पुरस्कार वितरण सोहळ्यात जिल्ह्यातील पुरस्काराची मानकरी म्हणून निवड झाली. पुरस्कार खासदार धैर्यशील माने यांच्या हस्ते प्रदान केला. डॉ. शिंदे यांना प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे आदींचे मार्गदर्शन लाभले.

Kolhapur, Gadhinglaj-Today
25/08/2021 Page No. 2

सकाळ

# 'डीकेएएससी'त विद्यार्थ्यांचा सत्कार

इचलकरंजी, ता. २ : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी शिक्षणाची गंगा तळागाळापर्यंत व दुर्गम वाड्यावस्त्यांपर्यंत पोहोचवली. विवेकानंद शिक्षण संस्था स्थापन करताना बापूजींनी सांगितलेल्या तत्त्वज्ञानाशी प्रत्येकाने बांधील राहून काम करायला हवे, असे मत श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी मांडले. डीकेएएससी महाविद्यालयात महाविद्यालय विकास समिती बैठकीत मार्गदर्शन करताना ते बोलत होते. विविध यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार केला. प्राचार्य साळुंखे यांच्या हस्ते भारतीय सैन्य दलात निवड झालेल्या एनसीसी विद्यार्थ्यांचा व बास्केटबॉल खेळात देश पातळीवर प्रथम आलेल्या खेळाडूंचा सत्कार केला. सुनील पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक व स्वागत प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी केले.



**इचलकरंजी : डिकेएएससी महाविद्यालयातील यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार प्राचार्य अभयकुमार साळुंखे उपस्थितीत करण्यात आला.**

Kolhapur, Gadhinglaj-Today
03/09/2021 Page No. 2

# सकाळ




इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात पालक-शिक्षक बैठकीत बोलताना प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे.

## ‘डीकेएएससी’मध्ये पालक-शिक्षक बैठक

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात कनिष्ठ विभागाची पालक -शिक्षक बैठक झाली. पालकांना संबोधित करताना ऑफलाईन कॉलेज सुरू करण्यासाठी काही उपाययोजना सांगत महाविद्यालयात बारावीच्या अध्ययनासाठी येताना कोरोनाचे नियम आचरणात आणून पाल्यास महाविद्यालयात पाठवण्याचे प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी सांगितले. राजू होगाडे, संजय जाधव, एस. बी. पाटील आदी पालकांनी मनोगत व्यक्त केले. प्रा. डी. बी. जाधव, प्रा. अजित साठे, प्रा. एच. बी. पाटील उपस्थित होते. प्रा. विश्वंभर कुलकर्णी, प्रा. मेजर मोहन वीरकर आदी उपस्थित होते.

Kolhapur, Gadhinglaj-Today
06/09/2021 Page No. 2

सकाळ

# डीकेएएससी कॉलेज

**इचलकरंजी :** डीकेएएससी कॉलेजमध्ये शिक्षक दिन साजरा झाला. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी प केले. डॉ. एकनाथ आळवेकर यांनी प्रास्ताविक केले. सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ. डी. सी. कांबळे यांनी आभार मानले. या वेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

Kolhapur, Gadhinglaj-Today
07/09/2021 Page No. 2

सकाळ



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात हिंदी दिनानिमित्त बोलताना प्रा. विश्वंभर कुलकर्णी. शेजारी मान्यवर.

# 'डीकेएएससी'मध्ये हिंदी दिवस

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात हिंदी दिवस साजरा केला. राष्ट्रभाषेविषयी विशेष स्थान मनात असावे. आपल्या देशाची, संस्कृतीची ओळख राष्ट्रभाषेमुळे होते. विश्वबंधुत्व, राष्ट्रभक्ती, आत्मशक्ती, मानवतेची शिकवण राष्ट्रभाषेमुळे मिळते. बहुभाषिक असूनही एकता, अखंडता, विविधता हिंदी भाषेत दिसून येते, असे विचार प्रा. विश्वंभर कुलकर्णी यांनी मांडले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. राधिका शर्मा हिने हिंदी दिवस यावर कविता सादर केली. प्रा. अर्चना तराळ, प्रा. कैलास गवळी, प्रा. मेजर मोहन विरकर आदी उपस्थित होते. प्रास्ताविक प्रा. अंजली उबाळे यांनी केले. आभार प्रा. एस. के. पाटील यांनी मानले.

Kolhapur, Gadhinglaj-Today
18/09/2021 Page No. 2

सकाळ

# डीकेएएससीतर्फे स्वच्छता मोहीम

इचलकरंजी : गणेश विसर्जनानंतर शहरातील विविध ठिकाणची स्वच्छता डीकेएएससी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी केली. गणेश विसर्जनानंतर दुसऱ्या दिवशी सकाळच्या सत्रात स्वयंसेवकांनी शहरातील प्रमुख मार्ग, चौक परिसर स्वच्छ केला. शाहू पुतळा चौक, बसस्टँड परिसर, सुंदर बाग परिसर या ठिकाणी मोठ्या प्रमाणात साचलेल्या कचऱ्याची विल्हेवाट लावली. प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे, कार्यक्रम अधिकारी प्रा. अरुण कटकोळे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी स्वच्छता मोहीम राबवली.

Kolhapur, Ichalkaranji-Today
23/09/2021 Page No. 4

सकाळ

# डीकेएएससी महाविद्यालयास भेट

**इचलकरंजी :** दत्ताजीराव कदम आर्टस् सायन्स आणि कॉमर्स महाविद्यालयास कर्नल एस. गणपती यांनी भेट दिली. डीकेएएससी महाविद्यालयास मुलींचे एनसीसी युनिट सुरू करण्यासाठी प्रस्ताव पाठवला होता. याबाबतची माहिती त्यांनी घेतली. तसेच एनसीसी कार्यालयाची पाहणी करून क्रीडा, आरडीसी, सांस्कृतिकच्या विद्यार्थ्यांची माहिती घेतली. प्रा. मेजर मोहन विरकर यांनी महाविद्यालयातील एनसीसी विभागाच्या राबविण्यात येणाऱ्या उपक्रमाची माहिती सांगितली. प्रा. वैशाली ढोबळे, लेफ्टनंट प्रमिला सुर्वे आदी उपस्थित होते.

Kolhapur, Gadhinglaj-Today
24/09/2021 Page No. 2

सकाळ

# 'डीकेएएससी'त राष्ट्रीय सेवा योजना दिन

**इचलकरंजी, ता. २४ :** डीकेएएसी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना दिन साजरा करण्यात आला. प्रा. डॉ. अशोक पाटील यांनी 'राष्ट्रीय सेवा योजना आणि युवकांची जबाबदारी' या विषयावर व्याख्यान दिले. प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे अध्यक्षस्थानी होते. विद्यार्थ्यांनी महाविद्यालय परिसरात स्वच्छता मोहीम राबवली. प्रा. अरुण कटकोळे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डी. जे. मुंगारे यांनी आभार मानले. डॉ. पी. के. वाघमारे, प्रा. व्ही. एल. कांबळे, प्रा. व्ही. एस. ढोबळे, डॉ. एस. टी. इंगळे, प्रा. टी. एस. हराळे आदी उपस्थित होते.

Kolhapur, Gadhinglaj-Today
25/09/2021 Page No. 2

**सकाळ**



**इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन कार्यक्रमात बोलताना ॲड. सुरेश चौगुले.**

# ‘डीकेएएससी’त माहिती अधिकार दिन

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन साजरा झाला. कॉमर्स, सांस्कृतिक, एनसीसी आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हा दिन साजरा झाला. माहिती अधिकार कायद्यातील तरतुदी आणि कार्यपद्धती समजावून सांगत कायद्यामुळे भ्रष्टाचाराला आळा बसेल, असे मत प्रमुख वक्ते ॲड. सुरेश चौगुले यांनी व्यक्त केले. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख मेजर एम. जे. वीरकर यांनी करून दिली. आभार प्रा. ए. एस. कटकोळे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. व्ही. पी. पाटील यांनी केले. डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. डी. ए. यादव, प्रा. विश्वंभर कुलकर्णी, डॉ. आर. एस. रॉड्रिक्स आदी उपस्थित होते.

Kolhapur, Gadhinglaj-Today
02/10/2021 Page No. 2

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE, ICHALKARANJI
LIBRARY

सकाळ

सोमवार,
४ ऑक्टोबर २०२१

## 'डीकेएएससी'मध्ये पालक-शिक्षक बैठक

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयात पालक-शिक्षक बैठक झाली. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. संतोष केणी यांनी मार्गदर्शन केले. महाविद्यालयातील सोयी-सुविधांबाबत सकारात्मक मते मांडून पालकांनी मार्गदर्शक सूचना केल्या. पालकांच्या सूचनांची सोडवणूक करण्याचे आश्वासन प्राचार्य डॉ. ढेकळे यांनी दिले. प्रा. टी. ए. हराळे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डी. ए. यादव यांनी आभार मानले. डॉ. व्ही. व्ही. गणबावले, प्रा. विजय पाटील, प्रा. अक्षय स्वामी, प्रा. सौरभ मोरे, प्रा. अजित साठे आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE ICHALKARANJI
LIBRARY

साप्ताहिक इचलकरंजी समाचार ● गुरुवार दि. ७-१०-२०२१ ●

# डीकेएएससी मध्ये एन.सी.सी.भरती

**इचलकरंजी –** दत्ताजीराव कदम ए. एस. सी. महाविद्यालायामध्ये एन सी सी विभागाची भरती शनिवार दि.०९/१०/२०२१ रोजी सकाळी ८.०० ते सायंकाळी ६ पर्यंत होणार आहे.मुले व मुली एकूण ४०० विध्यार्थी भरतीसाठी येणार आहेत. भरतीसाठी १६०० मी. रनिंग पुश – अप, सीट – अप, उंची, वजन व मुलाखत लेखी परीक्षा अशा निकषावर भरती प्रक्रिया होणार आहे. खेळाडू, जे.डी.एन.सी.सी. व सांस्कृतिकच्या मुलांना प्राधान्य दिले जाणार आहे.

ही भरती प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे. भरतीचे सर्व नियोजन प्रा. मेजर मोहन वीरकर प्रा. वैशाली ढोबळे करत आहे. भरती फक्त ए एस सी महाविद्यालयातील विध्यार्थासाठीच आहे.

Scanned with CamScanner

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE, ICHALKARANJI
LIBRARY

महासत्ता शुक्रवार, ८ ऑक्टोबर २०२१

# प्रा. रिता रॉड्रीक्स यांना पीएच.डी.

इचलकरंजी, ता. ७–



येथील डीकेएएससी कॉलेज इचलकरंजी वाणिज्य विभागातील प्रा. रिता रॉड्रीक्स यांना शिवाजी विद्यापीठाची कॉमर्स विषयात पीएच.डी पदवी प्राप्त झाली. त्यांनी कै. डॉ. एन.बी.भागवत यांच्या मार्गदर्शनाखाली 'इम्पॅक्ट ऑफ क्लस्टर डेव्हलपमेंट ऑन टेक्सटाईल इंडस्ट्री इन इचलकरंजी' या विषयावर प्रबंध सादर केला होता. त्यांना शिवाजी विद्यापीठातील डॉ.ए.एम.गुरव व डॉ.एस.एस. महाजन यांचे मार्गदर्शन लाभले.तसेच त्यांना महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, प्राचार्य डॉ.आर.आर.कुंभार, प्रभारी प्राचार्य डॉ.व्ही.एस.ढेकळे यांचेही संशोधनासाठी वेळोवेळी मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले. डॉ.सुधीर पाटील, प्रा.व्ही. एस.वांद्रे, तसेच पती सायमन रॉड्रीक्स यांची प्रेरणा मिळाली.

Scanned with CamScanner

सकाळ TODAY

सोमवार, १८ ऑक्टोबर २०२१ २

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE, ICHALKARANJI
LIBRARY

## डीकेएएससी महाविद्यालय

ग्रंथालय व मराठी विभागातर्फे ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात आले. ग्रंथ प्रदर्शनात विविध प्रकारातील पुस्तके मांडण्यात आली. ग्रंथपाल विजय यादव यांनी प्रास्ताविक केले. या वेळी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे, डॉ. एकनाथ आळवेकर, पी. डी. फडतरे आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ

शुक्रवार,
२२ ऑक्टोबर २०२१

# 'डीकेएएससी' भित्तिपत्रिकेचे अनावरण

**इचलकरंजी :** हिंदीच नव्हे तर इतर भाषांमधून उपलब्ध असणाऱ्या विविध आधुनिक तंत्रज्ञानाविषयी सखोल माहिती विद्यार्थ्यांना दिली पाहिजे. संवेदनशीलता हेच प्रकट करण्याचे सशक्त भाषेचे माध्यम आहे, असे मत डॉ. दीपक तुपे यांनी व्यक्त केले. डीकेएएससी महाविद्यालयात हिंदी विभागाच्या भित्तीपत्रिकेच्या अनावरणप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. प्रास्ताविक प्रा. अंजली उबाळे यांनी केले. आभार प्रा. विश्वंभर कुलकर्णी यांनी मानले.

CS Scanned with CamScanner

दै. सकाळ 23/10/2021

DATTAJIRAO KADAM A.S.C. COLLEGE, ICHALKARANJI
LIBRARY




इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालय व डीकेटीई कॉलेज यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला.

# डीकेएएससी-डीकेटीईमध्ये करार

इचलकरंजी, ता. २२ : डीकेएएससी महाविद्यालय वाणिज्य विभागामार्फत डीकेटीई एमबीए कॉलेजशी सामंजस्य करार झाला आहे. शैक्षणिक ज्ञानाचे आदान-प्रदान, सॉफ्टवेअर प्रशिक्षण, कौशल्य विकास प्रशिक्षण, संगणक प्रशिक्षण तसेच संगणक प्रयोगशाळा आणि ग्रंथालय या सुविधांचा वापर इत्यादीसाठी सामंजस्य करार केला. दोन्ही संस्थांमधील करारामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक व कौशल्य विकास तसेच रोजगाराच्या संधी या दृष्टीने लाभ होणार आहे. करारावर डीकेटीई संस्थेचे संचालक डॉ. पी. व्ही. कडोले व डीकेएएससी कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी स्वाक्षरी केल्या. प्रा. विजय पाटील, डॉ. रवींद्र कंठे, प्रा. अमोल गणपते आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

सकाळ

सोमवार,
२५ ऑक्टोबर २०२१

# सुशिलादेवी साळुंखे यांचा स्मृतिदिन

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयात श्रीमती सुशिलादेवी साळुंखे यांचा स्मृतिदिन झाला. स्मृतिदिनानिमित्त महिला सबलीकरण समिती व एनसीसी विभागातर्फे आरोग्य आणि स्वच्छता या विषयावर व्याख्यान आयोजित केले. पौगंडावस्थेतील बदल व आरोग्य समस्यांबाबत डॉ. आरती कोळी यांनी मार्गदर्शन केले. मासिक पाळी, समज गैरसमज याबाबत डॉ. विजय बेनाडीकर यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील होते. प्रास्ताविक डॉ. ए. ए. घारे यांनी केले. सुत्रसंचालन ए. एस. तपासे यांनी केले. आभार मेजर मोहन वीरकर यांनी मानले. महेश कांबळे, डॉ. एन. एस. शेख, प्रा. सौ. एस. टी. मोरे आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

दै. सकाळ 26/10/21

## डीकेएएससी महाविद्यालयाचे यश

इचलकरंजी : आरोग्य प्रशासनाच्या जिल्हास्तरीय प्रश्नमंजूषा स्पर्धेत डीकेएएससी महाविद्यालयाने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त केंद्र शासनाच्या विशेष कार्यक्रमातंर्गत जिल्हा एडस् प्रतिबंध व नियंत्रण पथक सीपीआर हॉस्पिटलतर्फे जिल्हास्तरीय महाविद्यालयीन प्रश्नमंजूषा स्पर्धा सायबर कॉलेज कोल्हापूर येथे झाली. स्पर्धेत डीकेएएससी महाविद्यालयाने द्वितीय क्रमांक पटकावला. वैभवी आढाव व राधिका शर्मा या विद्यार्थीनींना रोख दोन हजार रुपये व सन्मानचिन्ह देऊन गौरवले. त्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे, एनएसएस कार्यक्रम अधिकारी प्रा. अरुण कटकोळे, डॉ. वेल्हाळ व प्रा. डॉ. पी. के. वाघमारे यांचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

सकाळ

गुरुवार,
२८ ऑक्टोबर २०२१

# 'डीकेएएसी'मध्ये एनसीसी भरती

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयात एनसीसी भरती झाली. राजाराम स्टेडियम येथे झालेल्या भरती प्रक्रियेत एकूण ४०० विद्यार्थी उपस्थित होते. ५६ महाराष्ट्र बटालियनचे कमांडिग ऑफिसर कर्नल डी. सी. सायना यांच्या हस्ते झेंडा दाखवून भरती प्रक्रियेला सुरुवात झाली. भरतीसाठी एक हजार ६०० मीटर रनिंग, पुशअप्स, सीटप्स, उंची, वजन व प्रत्यक्ष मुलाखत, लेखी परीक्षा असे निकष होते. १० मुले व सात मुली असे १७ एनसीसी कॅडेट निवडले. सुभेदार मेजर विलास रामगुडे, सुभेदार कैलास साबळे यांनी भरती प्रक्रिया केली. प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांचे भरतीसाठी मार्गदर्शन लाभले. भरतीचे नियोजन प्रा. मेजर मोहन वीरकर, प्रा. वैशाली ढोबळे यांनी केले.

CS Scanned with CamScanner

साद प्रतिसाद

दि.१ ते १५ व १६ ते ३१ ऑक्टोबर २०२१

# डीकेएएससीत माहिती दिन साजरा

इचलकरंजी - डीकेएएससी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय माहिती अधिकार दिन साजरा झाला. कॉमर्स, सांस्कृतिक, एनसीसी आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने हा दिन साजरा झाला. माहिती अधिकार कायद्यातील तरतुदी आणि कार्यपध्दती समजावून सांगत कायद्यामुळे भ्रष्टाचाराला आळा बसेल, असे मत प्रमुख वक्ते ॲड.सुरेश चौगुले यांनी व्यक्त केले. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ.व्ही.एस.ढेकळे होते. प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांची ओळख मेजर एम.जे.वीरकर यांनी करुन दिली. तर आभार प्रा.ए.एस. कटकोळे यांनी मानले.

Scanned with CamScanner

सकाळ

सोमवार,
१ नोव्हेंबर २०२१




इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयात फटाके मुक्त दिवाळीची प्रतिज्ञा घेतली.

## 'डीकेएएससी'मध्ये फटाकेमुक्त दिवाळी

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयात दिवाळीच्या पार्श्वभूमीवर फटाकेमुक्त अभियान राबवले. दिवाळी फटाक्यांऐवजी मिठाई वाटून व नातेवाईकांना भेटून आनंदाने साजरी करावी, पैशाने फटाके खरेदी करून जाण्यापेक्षा पुस्तक खरेदी करून अनोख्या पध्दतीने दिवाळी साजरी करावी, असे आवाहन सौरभ पोवार याने केले. रूचिता पाटील हिने फटाकेमुक्त दिवाळीची प्रतिज्ञा दिली. विवेक वाहिनीच्यावतीने या अभियानाचे आयोजन केले. उपप्राचार्य डी. सी. कांबळे, प्रा. अर्जुन जाधव, प्रा. विशाल कांबळे आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

सकाळ

गुरुवार,
४ नोव्हेंबर २०२१

# रिता रॉड्रिक्स यांना पीएच.डी.



इचलकरंजी : डीकेएएसी महाविद्यालयातील प्रा. रिता रॉड्रिक्स यांना शिवाजी विद्यापीठाची पीएच.डी. मिळाली. 'इफेक्ट ऑफ क्लस्टर डेव्हलपमेंट ऑन टेक्स्टाईल इंडस्ट्री इन इचलकरंजी' या विषयावर त्यांनी प्रबंध सादर केला होता. कै. डॉ. एन. बी. भागवत यांच्या मार्गदर्शनाखाली सादर केलेल्या या प्रबंधाला त्यांना पीएच.डी. मिळाली. वाणिज्य विभागात त्या सहायक प्राध्यापिका म्हणून कार्यरत आहेत. त्यांना डॉ. ए. एम. गुरव, डॉ. एस. एस. महाजन, प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. व्ही. एस. ढेकळे यांचे मार्गदर्शन मिळाले.

Scanned with CamScanner

सकाळ
शुक्रवार,
५ नोव्हेंबर २०२१

# डॉ. व्ही. एस. ढेकळे यांची निवड


**ढेकळे**

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांची प्रोफेसरपदी निवड झाली. प्राचार्य ढेकळे यांचे वाणिज्य विभागातून निवड झाली आहे. ते गेली ५३ वर्षे स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेत ज्ञानदानाचे काम करत आहेत.

तसेच महाविद्यालयातील वनस्पती शास्त्र विभागप्रमुख उपप्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील यांचीही प्रोफेसरपदी निवड झाली.

ते गेली ३२ वर्षांपासून विवेकानंद संस्थेत कार्य करत आहेत. वरील दोन्ही प्राध्यापकांना शिवाजी विद्यापीठाकडून प्रोफेसरपदी बढती मिळाली.

CS Scanned with CamScanner

लोकमत

कोल्हापूर, मंगळवार, दि. ९ नोव्हेंबर २०२१

# डीकेएएससीत अभ्यासक्रमांना मान्यता

**इचलकरंजी :** येथील डीकेएएससी कॉलेजमध्ये ग्राफिक डिझाइन, डिप्लोमा इन प्रिंटिंग टेक्नॉलॉजी, डिप्लोमा इन टेक्स्टाइल टेक्नॉलॉजी, ॲडव्हान्स डिप्लोमा इन फोटोग्राफी या चार कौशल्य विकास अभ्यासक्रमासाठी सन २०२१-२२ पासून शासनाने मान्यता दिली आहे. या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये कौशल्ये विकसित होऊन नोकरीच्या संधी उपलब्ध होतील. यासाठी प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्या शुभांगी गावडे यांचे सहकार्य लाभले.

Scanned with CamScanner

सकाळ

मंगळवार,
९ नोव्हेंबर २०२१

# 'डीकेएएससी' अभ्यासक्रमांना मान्यता

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयात विविध कौशल्य विकास अभ्यासक्रमांना मान्यता मिळाली आहे. यूजीसी व एनएसक्यूएफ योजनेंतर्गत ग्राफीक डिझाईन, डिप्लोमा इन प्रिंटिंग टेक्नॉलॉजी, डिप्लोमा इन टेक्स्टाईल टेक्नॉलॉजी, डिप्लोमा इन ॲडव्हान्स फोटोग्राफी या अभ्यासक्रमांना चालू वर्षापासून मान्यता मिळाली आहे. या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये विविध कौशल्य विकसित होऊन नोकरीच्या संधी उपलब्ध होतील. या अभ्यासक्रमासाठी समन्वयक म्हणून डॉ. ए. एस. तपासे काम पाहणार आहेत. यासाठी प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्या सौ. शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांचे सहकार्य मिळाले.

CS Scanned with CamScanner

तरुण भारत

मंगळवार, ९ नोव्हेंबर २०२१

# डीकेएएससीमध्ये कौशल्य विकास अभ्यासक्रम

**इचलकरंजी :** येथील डीकेएएससी कॉलेजमध्ये यूजीसी-एनएसक्यूएफ योजनेंतर्गत ग्राफिक डिझाईन, डिप्लोमा इन प्रिटिंग टेक्नॉलॉजी, डिप्लोमा इन टेक्सटाईल टेक्नॉलॉजी, ॲडव्हान्स डिप्लोमा इन फोटोग्राफी या चार कौशल्य विकास अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ पासून राज्य शासनाने मान्यता दिली आहे. यासाठी संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार व प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांचे मार्गदर्शन मिळाले.

Scanned with CamScanner

दै. साम्राज्य इचलकरंजी समाचार
10-11-2021

# ए.एस.सी. महाविद्यालयात कौशल्य विकास अभ्यासक्रमांना मान्यता

इचलकरंजी, दि. ८ –येथील डी.के.ए.एस.सी. महाविद्यालयात यूजीसी- एन एस क्यू एफ योजनेअंतर्गत ग्राफिक डिझाइन, डिप्लोमा इन प्रिंटिंग टेक्नॉलॉजी, डिप्लोमा इन टेक्सटाईल टेक्नॉलॉजी ॲडव्हान्स डिप्लोमा इन फोटोग्राफी या चार कौशल्य विकास अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ पासून महाराष्ट्र शासनाने मान्यता दिली आहे. यासाठी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. आर.आर. कुंभार व प्राचार्य डॉ. व्ही.एस. ढेकळे यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये विविध कौशल्ये विकसित होऊन नोकरीच्या संधी उपलब्ध होतील. तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी प्रवेश प्रक्रियेसाठी डॉ. ए.एस. तपासे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन महाविद्यालयाने केले आहे.

CS Scanned with CamScanner

सकाळ

शनिवार, २७ नोव्हेंबर २०२१

# शिरोळ, हातकणंगलेत संविधानाचा जागर

## विविध उपक्रमांचे आयोजन; संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन

**इचलकरंजी, ता. २६ :** शहर व परिसरात संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. विविध उपक्रमांतून संविधानाचे महत्त्व सांगत संविधानाचा जागर करण्यात आला. संविधान जनजागृतीपर विविध स्पर्धा, व्याख्याने, यासह शाळा, महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी संविधान प्रास्ताविकेचे सामूहिकरीत्या वाचन केले. संविधानातून देशाची एकता सांगत 'माझे संविधान माझा अभिमान' या उपक्रमात विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग राहिला. यासह सामाजिक संघटना, राजकीय पक्ष कार्यालयात संविधान दिन साजरा झाला.

### मालती माने विद्यालय

विद्यार्थ्यांनी संविधान स्वीकृती दिन साजरा केला. विविध भारतीय वेशभूषा केलेल्या मुला-मुलींनी धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व सांगत पालखीतून संविधानाची फेरी काढली. पालखी फेरीच्या मार्गावर ठिकठिकाणी भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिकरीत्या सादरीकरण केले. विद्यार्थी, शिक्षक, पालकांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन केले. मुख्याध्यापक संजय रेंदाळकर, मनीषा कांबळे आदी सहभागी झाले होते.

### व्यंकटेश महाविद्यालय

प्रत्येकाच्या जीवनात संविधानाचे महत्त्व आहे. त्यामुळे प्रत्येकाने संविधानाचा अंगीकार केला पाहिजे, असे मत संविधान दिवस आणि

### इंग्लिश मीडियम हायस्कूल

विद्यार्थ्यांनी भारतीय संविधानाचे वाचन केले. 'माझे संविधान माझा अभिमान' या उपक्रमांतर्गत घोषवाक्य स्पर्धा झाल्या. संविधानातील मूलतत्त्वे, अधिकार या विषयावर विद्यार्थ्यांनी प्रभावी घोषवाक्य तयार केले. मुख्याध्यापिका माला सूद, सौ. भारती कासार उपस्थित होते.

### दि न्यू हायस्कूल अँण्ड ज्युनिअर कॉलेज

विद्यार्थ्यांनी संविधान प्रास्ताविकेचे वाचन केले. मुख्याध्यापक एस. ए. पाटील यांनी विद्यार्थ्यांना संविधानाबद्दल माहिती सांगितली. वक्तृत्व, निबंध, रांगोळी व भीत्तिपत्रिकेचे आयोजन केले. पर्यवेक्षक श्री. परीट, डी. एम. महाले, ए. बी. पाटील आदी उपस्थित होते.

### डीकेएएससी महाविद्यालय

विद्यार्थी, प्राध्यापकांनी संविधान उद्देश पत्रिकेचे सामूहिक वाचन केले. भारतीय राज्य घटनेविषयी डॉ. व्ही. बी. शिंदे यांनी मार्गदर्शन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी केले. प्रा. अरुण कटकोळे, प्रा. मेजर मोहन वीरकर आदी उपस्थित होते.

### कन्या महाविद्यालय

भारतीय संविधान व मताधिकार



इचलकरंजी : मालती माने विद्यालयात वेशभूषा केलेल्या मुला-मुलींनी धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व सांगत पालखीतून संविधानाची फेरी काढली.

### समाजवादी प्रबोधिनी

'स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव' या विषयावर ग्रंथ प्रदर्शन आयोजित केले आहे. प्रदर्शनाचे उद्घाटन संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करून केले. शशांक बावचकर यांनी संविधान दिनाचे महत्त्व सांगितले. प्रसाद कुलकर्णी, तुकाराम अपराध आदी उपस्थित होते.

### भारतीय जनता पार्टी

अॅड. भरत जोशी, विकास बनसोडे यांच्या हस्ते संविधान प्रतिमा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन केले. संविधान प्रास्ताविकेचे वाचन केले. शहराध्यक्ष अनिल डाळ्या, मिश्रीलाल जाजू आदी

प्राचार्य प्रदीप पाटील यांनी केले. पर्यवेक्षक पी. बी. पाटील, एस. बी. सरडे, राहुल निचिते, अमित पानारी, चाँद मोमीन, पी. एल. पोवार, धनाजी कराडे, विजय मोरे, भीमसेन सनदी, मनोज शिंगे, सूर्यकांत जाधव, पी. डी. कुंभार प्रमुख उपस्थित होते. संविधान वाचन रेवती जाधव हिने केले. तसेच संविधानविषयक प्रबोधन ओम पिसे याने केले. भित्तीपत्रक समितीकडून तयार केलेल्या संविधान विषयक भित्तीपत्रिकेंचे अनावरण प्रमुख उपस्थितांच्या हस्ते झाले.

### डांगे महाविद्यालय

**कबनूर :** हातकणंगले येथील अण्णासाहेब डांगे महाविद्यालयात

आदी उपस्थित होते. प्रा. डॉ. समीर गायकवाड यांनी सूत्रसंचालन केले. ऋषिकेश नांगनुरे यांनी आभार मानले.

### कुरुंदवाडला संविधानाचे वाचन

**कुरुंदवाड :** भारतीय संविधान दिनानिमित्त शहरातील शासकीय-निमशासकीय, शैक्षणिक संस्था, नगरपरिषद व सहकारी संस्थांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून भारतीय संविधानाचे सार्वजनिक वाचन करण्यात आले.

### पटवर्धन हायस्कूल

येथील सीताबाई पटवर्धन हायस्कूलमध्ये डॉ. बाबासाहेब

कुलकर्णी, पर्यवेक्षक विजय कुलकर्णी आदींनी पुष्पहार अर्पण केला. राष्ट्रीय छात्र सेनेचे कमांडिंग ऑफिसर बाबासाहेब भुजूगडे यांनी संविधानाचे वाचन केले.

### कुरुंदवाड नगरपरिषद

येथील नगरपरिषदेमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून कर्मचाऱ्यांच्या वतीने भारतीय संविधानाचे वाचन केले. उत्कृष्ट कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा मुख्याधिकारी निखिल जाधव यांच्या हस्ते सत्कार केला. कार्यालयीन अधीक्षका पूजा पाटील, महादेव आंबी आदी उपस्थित होते.

### कुरूंदवाड पोलिस ठाणे

येथील पोलिस ठाण्यात भारतीय संविधान दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन सहायक पोलिस निरीक्षक बालाजी भांगे यांनी केले. पोलिस उपनिरीक्षक अमित पाटील व किशोरकुमार खाडे उपस्थित होते. पोलिस कर्मचाऱ्यांसह संविधानाचे वाचन केले. हवालदार फोंडे, विजय घाटगे उपस्थित होते.

### संविधान गौरव समिती

**जयसिंगपूर :** शिरोळ तालुका भारतीय संविधान गौरव समितीच्या वतीने जयसिंगपूर येथील क्रांती चौकात संविधान दिन साजरा केला. प्रथम भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते केले. संविधानाचे वाचन

Scanned with CamScanner

सकाळ




**इचलकरंजी : डीकेएएसी महाविद्यालयात माझी वसुंधरा अभियानाची सुरवात झाली.**

# माझी वसुंधरा अभियानाचा प्रारंभ

**इचलकरंजी :** डीकेएएसी महाविद्यालयात माझी वसुंधरा अभियानाची सुरवात झाली. महाविद्यालयात एनसीसी, एनएसएससह विद्यार्थ्यांनी माझी वसुंधराची शपथ घेतली. या अभियानाद्वारे शहरात पर्यावरण संवर्धनासह ठिकठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. जैव विविधतेचे रक्षण करण्याचा संदेश या मोहिमेद्वारे देण्यात येणार आहे. नगरपालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. सुनीलदत्त संगेवार, प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्या प्रमुख उपस्थितीत या अभियानास प्रारंभ झाला. एनसीसी कॅडेट प्रिती पाटील हिने शपथ दिली. प्रा. मेजर मोहन वीरकर, प्रा. अरूण कटकोळे, प्रा. मधुकर हिंगे, प्रा. एस. एस. पाटील आदी उपस्थित होते.

Kolhapur, Gadhinglaj-Today
17/11/2021 Page No. 2

सकाळ

मंगळवार,
३० नोव्हेंबर २०२१




**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयात एनसीसी डे निमित्त आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्रा. संदीप राणे.

# डीकेएएससी महाविद्यालयात एनसीसी डे

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयात एनसीसी डे साजरा केला. एनसीसी विभागाच्या वतीने स्पर्धा परीक्षा, एनसीसी व क्रीडा क्षेत्रातील विद्यार्थी संधी या विषयावर मार्गदर्शन आयोजित केले होते. प्रा. संदीप राणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करण्याच्या पध्दती सांगत आपल्या क्षेत्रातील संधी ओळखून अभ्यास करण्याचे आवाहन त्यांनी केले. स्वागत व प्रास्ताविक प्रा. मेजर मोहन वीरकर यांनी केले. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. डी. सी. कांबळे होते. प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कार्यक्रमात डी. ए. यादव, प्रा. सौ. वैशाली ढोबळे आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

सकाळ

मंगळवार,
३० नोव्हेंबर २०२१

# विद्यार्थ्यांच्या वादात गावगुंडांचा शिरकाव

## इचलकरंजीत शाळा, महाविद्यालयाबाहेर दोन गटात वादाचे वाढते प्रकार

इचलकरंजी, ता.२९ : बऱ्याच विश्रांतीनंतर आता विद्यार्थ्यांच्या क्षुल्लक भांडणात गावगुंड सक्रिय होऊ लागले आहेत. शाळा, महाविद्यालयाबाहेर दोन गटात वाद उफाळून येण्याचे प्रकार वाढत आहेत. गेल्या आठवड्यात चार वेळा हाणामारीच्या घटना शाळा, महाविद्यालयाबाहेर मुख्य मार्गावरच घडल्या. विद्यार्थ्यांच्या किरकोळ कारणावरून होणारा वाद दोन गटातील वर्चस्वाच्या गंभीरतेला कारणीभूत ठरत आहे. त्यामुळे शहरात वाढत्या गुन्हेगारीच्या काळात अशा घटना पोलिसांची डोकेदुखी ठरत आहेत.

शाळा, महाविद्यालय म्हटले की विद्यार्थ्यांचे वाद आलेच. याच वादाला शहरातील गुन्हेगारी विश्वातील गावगुंड व्यापक रूप देण्यात अग्रेसर राहिले. ही समस्या शहरात नवीन नाही. मात्र पोलिस व शाळा, महाविद्यालय प्रशासनाने यावर वचक आणला. कोरोनानंतर आता शाळा, महाविद्यालय पूर्ववत गजबजत आहेत. विद्यार्थ्यांची वर्दळ वाढून माहोलही दिसत आहे. अशातच विद्यार्थ्यांचे एकमेकांत किरकोळ कारणातून होणारे वाद शाळेत न मिटता भररस्त्यात मिटू लागले आहेत. गावगुंडांचे यामध्ये फावत असून वादाला नवे रूप मिळत आहे. दोन विद्यार्थ्यांमधील किरकोळ वाद दोन गुन्हेगारी टोळ्यांपर्यंत पोहचत आहे. गेल्या आठवड्यात शहरात अशा चार घटनांना पोलिसांना सामोरे जावे लागले आहे.

विद्यार्थ्यांचा अंतर्गत भांडणात गुन्हेगारी संबंधित तरुणांचा शिरकाव वाढत आहे. दोन गट एकमेकांशी भिडल्यानंतर निर्माण होणाऱ्या वर्चस्व गुन्हेगारी टोळीला खतपाणी घालणारे ठरू शकते. शिक्षणातून जीवन घडवण्याच्या वयात या गोष्टी विद्यार्थ्यांना मारक ठरत आहेत. सध्या शाळा, महाविद्यालय सुरू झाल्याने दोन गटातील वाद हाणामारीचे प्रकार वारंवार घडत आहेत. शाळा, महाविद्यालये सुटण्याच्यावेळी काही गावगुंड घुटमळत असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना शिस्तीचे धडे शिकवण्याची गरज निर्माण झाली आहे.

### पोलिसांची भूमिका महत्त्वाची

शहरातील गावगुंडांचा शाळा महाविद्यालय परिसरातील वाढता प्रादुर्भाव पोलिसांसाठी आव्हानात्मक आहे. विद्यार्थी वादातील किरकोळ कारणांना बळीचा बकरा करून गाव गुंड दहशत माजवत आपले अस्तित्व निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे शाळा, महाविद्यालये भरण्याच्या व सुटण्याच्या वेळी परिसरात पोलिसांनी तळ ठोकून गावगुंडांचे वाढते तळ नष्ट करणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### शिस्त कमिटीने सक्रिय व्हावे

प्रत्येक शाळा, महाविद्यालयात शिस्त कमिटी कार्यरत असते. या कमिट्या कार्यान्वित करून वेळीच विद्यार्थ्यांना शिस्तीचे धडे दिले पाहिजेत. तरच विद्यार्थ्यांचे वर्गातील वाद शिक्षकांसमोर मिटतील. त्यामुळे विद्यार्थ्यांवर शिस्त कमिटीच्या वेळीच नियंत्रणाची गरज आहे.

> “महाविद्यालयात शिस्तीबाबत मुलांच्या पालकांना मार्गदर्शन केले आहे. गावगुंडांचे हेलपाटे महाविद्यालय परिसरात जास्त असतात. त्यामुळे गेटच्या बाहेर मर्यादा येतात. पोलिसांनी शाळा, महाविद्यालय परिसरात सातत्याने पेट्रोलिंग केल्यास गावगुंड पुन्हा फिरकणार नाहीत.
>
> - प्रा. मेजर मोहन वीरकर

Scanned with CamScanner

तरुण भारत

बुधवार, १ डिसेंबर २०२१

# ‘डीकेएएससी’त स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन

प्रतिनिधी / इचलकरंजी

दत्ताजीराव कदम आर्टस सायन्स अँड कॉमर्स कॉलेज येथे एनसीसी डे साजरा करण्यात आला. महाविद्यालयातील एनसीसी विभागाच्यावतीने आयोजित कार्यक्रमासाठी ब्रिज अकॅडमीचे संस्थापक प्रा. संदीप राणे प्रमुख उपस्थिती होती.

दीपप्रज्वलन आणि प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. एनसीसी विभाग प्रमुख प्रा. मेजर मोहन वीरकर यांनी प्रास्ताविक केले. प्रा. संदीप राणे यांनी स्पर्धा परीक्षेसंदर्भात मुलांना मार्गदर्शन केले. एमपीएससी, यूपीएससी, एसटीआय, पीएसआय व इतर स्पर्धा परीक्षेबाबत माहिती दिली. एनसीसी आणि क्रीडा क्षेत्रातील विद्यार्थ्यांना संधीबाबत माहिती दिली. तरुण भारतचे प्रतिनिधी संजय खूळ यांनी ही मुलांना एनसीसी डे च्या शुभेच्छा दिल्या. प्रा. डॉ. डी.सी. कांबळे अध्यक्षस्थानी होते. प्रा. डी. जे. यादव यांची प्रमुख उपस्थिती होती. प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम झाला. यावेळी एनसीसी कॅंडिडेट आणि विद्यार्थी उपस्थित होते. आभार प्रा. सौ. ढोबळे यांनी मानले. कॅडेट सुप्रिया उल्ले यांनी सूत्रसंचालन केले.




**इचलकरंजी : डीकेएएससी कॉलेजमध्ये स्पर्धा परीक्षेबाबत मार्गदर्शन करताना प्रा. संदीप राणे, व्यासपीठावर मान्यवर.**

Scanned with CamScanner

सकाळ

सोमवार,
६ डिसेंबर २०२१



इचलकरंजी : विद्यापीठस्तरीय योगा स्पर्धेतील डीकेएएससी महाविद्यालयातील यशस्वी खेळाडूंचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे, प्रा. मेजर मोहन वीरकर आदी.

## 'डीकेएएससी'चे योगा स्पर्धेत यश

इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयातील दोन विद्यार्थ्यांनी विद्यापीठस्तरीय योगा स्पर्धेत यश प्राप्त केले. या स्पर्धा सातारा येथे पार पडल्या. मुलींच्या गटात सानिका जाधवने द्वितीय, तर मुलांच्या गटात मनन कासलीवाल याने प्रथम क्रमांक मिळविला. भुवनेश्वर (ओडिसा) येथे होणाऱ्या आंतरविद्यापीठ योगा स्पर्धेसाठी दोघांची निवड झाली आहे. आंतरविद्यापीठ योगा स्पर्धेसाठी शिवाजी विद्यापीठाचे नेतृत्व करण्याची संधी यामुळे डीकेएएससी महाविद्यालयाला मिळाली आहे. प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्या हस्ते खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. खेळाडूंना प्रा. मेजर मोहन वीरकर, प्रा. मुजफ्फर लगिवाले, जयकुमार करके आदींचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

सकाळ

मंगळवार,
७ डिसेंबर २०२१



इचलकरंजी : पंधरा दिवसांवर आलेल्या युवा महोत्सवासाठी महाविद्यालयात नृत्याचा सराव करताना मुली.

# युवा महोत्सवासाठी महाविद्यालये सज्ज

इचलकरंजी, ता. ६ : कोरोनामुळे दुरावलेला महाविद्यालयीन तरुणाईचा उत्साह आता दुणावला आहे. यंदा शिवाजी विद्यापीठाने युवा महोत्सव ऑफलाइन आयोजन केल्याने तरुणाईच्या कलागुणांचे खऱ्या अर्थाने चीज होणार आहे. कलागुणांचे रंग लुटत रंगभूमीशी अतूट बंध जोडण्यासाठी युवा सज्ज झाला आहे. पंधरा दिवसांवर आलेल्या जिल्हास्तरीय युवा महोत्सवासाठी प्रत्येक महाविद्यालयात कलाप्रकारांच्या सरावाला वेग आला आहे. स्पर्धेत जिंकण्याबरोबर तब्बल दोन वर्षांनी जल्लोषाच्या उधाणात तरुणाईला नवनाट्याचे नवरस लेवण्याची संधी मिळणार आहे.

गतवर्षी कोरोनात घाईगडबडीत विद्यापीठाचा ऑनलाईन जिल्हास्तरीय युवा महोत्सव झाला. दिवाळीनंतर महाविद्यालये सुरू होताच विद्यापीठाने युवा महोत्सव पूर्वीप्रमाणे घेण्याचे घोषित केले. यामुळे ज्या त्या महाविद्यालयात सांघिक व वैयक्तिक प्रकारानुसार विद्यार्थी कलाकार निश्चित करून प्रत्यक्ष सरावाला गती दिली आहे. पंधरा दिवसांवर आलेल्या युवा महोत्सवाच्या तयारीत सर्व महाविद्यालये सध्या गुंतली आहेत. २४ डिसेंबरला न्यू कॉलेज, कोल्हापूर येथे होणाऱ्या युवा महोत्सवाच्या तयारीसाठी सर्वच महाविद्यालये वेगाने कामाला लागली आहेत.

> **“ महाविद्यालये सुरू होताच विद्यापीठाने युवा महोत्सवाचे परिपत्रक काढले. यासाठी विद्यार्थ्यांचाही प्रतिसाद चांगला आहे. वैयक्तिक व सामूहिक कलाप्रकारांची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. कोरोनानंतर होणाऱ्या युवा महोत्सवाची उत्सुकता महाविद्यालयांना लागली आहे.**
> **-प्रा. डॉ. डी. सी. कांबळे,**
> सांस्कृतिक विभागप्रमुख,
> डीकेएएससी महाविद्यालय

CS Scanned with CamScanner

सकाळ
गुरुवार,
९ डिसेंबर २०२१



पन्हाळा : येथे झालेल्या एनसीसीच्या राष्ट्रीय शिबिरात डीकेएएससी महाविद्यालयाच्या एनसीसी युनिटला गौरविण्यात आले.

# 'डीकेएएसी'चा गौरव

**इचलकरंजी :** ५६ महाराष्ट्र बटालियन एनसीसी कोल्हापूरच्या वतीने पन्हाळा येथे शिवाजी ट्रेल ट्रॅक राष्ट्रीय शिबिर झाले. यात डीकेएएससी महाविद्यालयाच्या एनसीसी युनिटने सांस्कृतिक कला प्रकारांसह अनेक चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर केली. शिबिरात केलेल्या सादरीकरणामुळे कर्नल डी. एस. सायना, कर्नल वैजयंत थोरात यांच्या हस्ते एनसीसी कॅडेटचा सत्कार तेला. यामध्ये विद्यार्थ्यांनी देशभक्तिपर नृत्य, वैयक्तीक नृत्य, समूह नृत्य यांसह दांडपट्टा सादर केले. प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे, प्रा. मेजर मोहन वीरकर, प्रा. वैशाली ढोबळे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयाचे एनसीसी युनिट राष्ट्रीय शिबिरात सहभागी झाले होते. सुभेदार मेजर विलास रामगुंडे, ब्रिगेडियर समीर साळुंखे आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

सकाळ
कोल्हापूर, शुक्रवार,
१० डिसेंबर २०२१

# प्राचार्या शुभांगी गावडे यांना कौशल्यरत्न जीवनगौरव

## दिल्लीत पुरस्कार प्रदान ; शैक्षणिक कार्याची दखल



शुभांगी गावडे

कोल्हापूर, ता. ९ : स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सचिव प्राचार्या शुभांगी गावडे यांना २०२१ चा राष्ट्रीय शिक्षा कौशल्यरत्न जीवनगौरव पुरस्कार श्रीजगद्गुरू शंकराचार्य स्वामी निश्चलानंद सरस्वती यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. दिल्ली येथील स्कील संस्थेतर्फे तो जाहीर झाला होता.

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे व सुशीलादेवी साळुंखे यांच्या अथक प्रयत्नातून स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था स्थापन झाली. संस्था महाराष्ट्र व कर्नाटकातील १४ जिल्ह्यांत सुमारे ४०७ हून अधिक संस्कार केंद्रातून गरीब, उपेक्षित, वंचित, आदिवासी, शेतकरी, ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी गेली अनेक तपे ज्ञानदानाचे कार्य करीत आहे. डॉ. साळुंखे यांच्या घराण्यातील तिसऱ्या पिढीच्या वारसदार प्राचार्या शुभांगी गावडे या सक्षमपणे नेतृत्व करीत आहेत. त्यांनी संस्थेत गुणवत्ता विकासाबरोबर भौतिक, मूलभूत सुविधा, शैक्षणिक साहित्य आणि आधुनिक शैक्षणिक बदल यशस्वीपणे राबविले आहेत. त्यामुळेच कला, क्रीडा, साहित्य, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले.त्याची नोंद घेऊन दिल्ली येथील स्कील संस्थेने शिक्षा कौशल्यरत्न जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित केले आहे. पुरस्कार वितरणप्रसंगी स्वामी गोविंद देवगिरी महाराज, इंदोरीकर महाराज, भारताचे माजी राजदूत ज्ञानेश्वर मुळे, संस्थेचे 'सीईओ' कौस्तुभ गावडे उपस्थित होते. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ, सहसचिव (प्रशासन) प्राचार्य एस. एम. गवळी, सहसचिव, विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी त्यांचे अभिनंदन केले.

**“ शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे व सुशीलादेवी साळुंखे यांच्या प्रेरणादायी संस्कारांत माझी जडणघडण झाली. संस्थेचे कार्यकर्ते व प्रशासकीय कर्मचारी यांनी आजवर केलेल्या त्यागमय सेवेमुळे स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था सर्वोत्कृष्ट शिक्षण संस्था म्हणून प्रामाणिकपणे कार्य करीत आहे. त्या सर्व कार्यकर्त्यांच्या कार्याचा सन्मान म्हणजेच हा पुरस्कार आहे, असे मी मानते.**
**- शुभांगी गावडे,** प्राचार्या

Scanned with CamScanner

सकाळ
शुक्रवार,
१० डिसेंबर २०२१

# 'डीकेएएससी'मध्ये विवेक वाहिनीचे उद्घाटन

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयात विवेक वाहिनीचे उद्घाटन करण्यात आले. 'अंनिस'चे सुनील स्वामी यांच्या हस्ते उद्घाटन झाले. विवेक वाहिनीतून विद्यार्थी घडतात आणि त्यासोबतच राष्ट्रीय विवेक निर्माण होऊन उन्नती होते, असे मत स्वामी यांनी मांडले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. समन्वयक डॉ. एस. बी. बेंद्रे यांनी विवेक वाहिनीच्या माध्यमातून होणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. अमित कोवे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. या वेळी प्रा. अरुण कटकोळे, प्रा. ए. पी. जाधव, प्रा. विशाल कांबळे यासह विद्यार्थी उपस्थित होते. वैभवी आढाव व राधिका शर्मानि सूत्रसंचालन केले. पवन होदलूर यांनी आभार मानले.

CS Scanned with CamScanner

पुण्य नगरी ▮ शनिवार, ११ डिसेंबर २०२१

# शुभांगी गावडे यांना जीवन गौरव पुरस्कार



**कोल्हापूर :** श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी मुरलीधर गावडे यांना स्कील, दिल्ली यांच्या वतीने २०२१ चा राष्ट्रीय जीवन गौरव पुरस्कार शंकराचार्य स्वामी निश्चलानंद सरस्वती यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी स्वामी गोविंद देवगिरीजी महाराज, इंदोरीकर महाराज, भारताचे माजी राजदूत ज्ञानेश्वर मुळे, संस्थेचे सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे उपस्थित होते. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे आणि संस्थामाता सुशीलादेवी साळुंखे यांच्या अथक प्रयत्नांतून साकारलेली श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था महाराष्ट्र व कर्नाटकात सर्वदूर १४ जिल्ह्यांत सुमारे ४०७ हून अधिक संस्कार केंद्रांतून गोरगरीब, उपेक्षित, वंचित, आदिवासी, शेतकरी, ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी गेली अनेक तपे ज्ञानदानाचे कार्य करत आहे. या घराण्यातील तिसऱ्या पिढीचे वारसदार नेतृत्व प्राचार्या शुभांगी गावडे या सक्षमपणे सांभाळीत आहेत. या पुरस्काराबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ, सहसचिव (प्रशासन) प्राचार्य एस. एम. गवळी, सहसचिव (अर्थ), संस्थेचे सी.ई.ओ. कौस्तुभ गावडे, विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, संस्थेचे आजी-माजी पदाधिकारी, शाखाप्रमुख, प्राचार्य, प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी तसेच समाजातील विविध संस्था, सर्व घटकांतून त्यांचे कौतुक होत आहे.

CS Scanned with CamScanner

पुण्य नगरी ▮ रविवार, १२ डिसेंबर २०२१

# डॉ. बापूजी साळुंखे यांच्या संस्काराचा गौरव

## प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचे गौरवोद्गार; डॉ. आर. आर. कुंभार यांचा सत्कार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

बहुजन समाजातील मुला-मुलींना शिक्षणाचा लाभ व्हावा म्हणून शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था स्थापन केली. विवेकानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांना मिळालेला शिवाजी विद्यापीठाचा 'गुणवंत प्राचार्य पुरस्कार २०२१' हा बापूजींच्या विचारकार्याचा व संस्काराचा गौरव आहे, असे गौरवोद्गार श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी काढले.



**कोल्हापूर : प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचा मानपत्र देऊन सपत्नीक सत्कार करताना प्राचार्य अभयकुमार साळुंखे. सोबत अन्य मान्यवर.**

यावेळी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचा मानपत्र देऊन सपत्नीक सत्कार कार्याध्यक्ष प्राचार्य साळुंखे यांचे हस्ते करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाच्या आयक्यूएसीच्या समन्वयक डॉ. श्रुती जोशी, रजिस्ट्रार सी. बी. दोडमणी यांनी मनोगत व्यक्त केले. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांना पद्म पुरस्कार मिळावा म्हणून केंद्र शासनाकडे पाठवण्यासाठी संकलित केलेली पत्रे प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांचेकडे सुपूर्द करण्यात आली.

स्वागत व प्रास्ताविक प्रा. अशोक पाटील यांनी केले, तर प्रा. डॉ. प्रदीप पाटील लिखित मानपत्राचे वाचन डॉ. सुप्रिया पाटील यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. समीक्षा फराकटे यांनी केले. आभार प्रा. एच. व्ही. चामे यांनी मानले.

Scanned with CamScanner

सकाळ

सोमवार,
१३ डिसेंबर २०२१



इचलकरंजी : शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय बॉक्सिंग स्पर्धेत सुवर्णपदकप्राप्त डीकेएएससी महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे, प्रा. मेजर मोहन वीरकर.

# डीकेएएससी महाविद्यालयाचे यश

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयाने शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय बॉक्सिंग स्पर्धेत उल्लेखनीय यश प्राप्त केले. तीन विद्यार्थिनींनी वजनी गटात सुवर्णपदक पटकावले. अलिशा नायकवडी हिने ६३-६६ किलो वजनी गटात, श्रुती लोहार हिने ६६ ते ७० किलो वजनी गट तर अंकिता पाटील हिने ५७ ते ६० किलो वजनी गटात उत्कृष्ट कामगिरी करत सुवर्णपदकाची कमाई केली. तीन विद्यार्थीनींची जालंधर येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ बॉक्सींग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या तीन विद्यार्थीनी शिवाजी विद्यापीठाच्या संघाचे नेतृत्व करणार आहेत. प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार केला. यशस्वी खेळाडूंना प्रा. मेजर मोहन वीरकर, प्रा. मुजफ्फर लगीवाले, जयकुमार करके आदींचे मार्गदर्शन लाभले.

Scanned with CamScanner

सकाळ

मंगळवार,
१४ डिसेंबर २०२१



इचलकरंजी : डीकेएएससी महाविद्यालयातर्फे बिपीन रावत यांना आदरांजली वाहण्यात आली.

# 'डीकेएएससी'त रावत यांना आदरांजली

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयाच्या प्रांगणात बीपिन रावत यांना आदरांजली वाहण्यात आली. महाविद्यालयातील सर्व विभागातील विद्यार्थी, प्राध्यापक यांनी सामुदायिकरित्या श्रध्दांजली वाहिली. प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्या हस्ते बिपीन रावत यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. शोकसभेत प्राचार्य डॉ. ढेकळे, डॉ. डी. सी. कांबळे, मेजर मोहन वीरकर, प्रा. डी. ए. यादव आदींनी मनोगत व्यक्त केले. यावेळी एनसीसी, एनएसएस, सांस्कृतिक यासह सर्व विभागाचे विद्यार्थी, प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Scanned with CamScanner

सकाळ

गुरुवार,
१६ डिसेंबर २०२१

## 'डीकेएएससी'मध्ये रक्त तपासणी शिबिर

**इचलकरंजी :** एड्स सप्ताहानिमित्त इंदिरा गांधी सामान्य रुग्णालयातर्फे डीकेएएससी महाविद्यालयात मोफत रक्त तपासणी शिबिर व जाणीव जागृती प्रबोधन केले. विद्यार्थ्यांसह प्राध्यापकांची रक्त तपासणी केली. एड्स जनजागृती व प्रबोधन करत सौ. अर्चना वाघमारे यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे होते. समुपदेशिका सौ. कांबळे, प्रा. अरुण कटकोळे, प्रा. मेजर मोहन वीरकर, डॉ. डी. सी. कांबळे, प्रा. सौ. वैशाली ढोबळे आदी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

सकाळ

शुक्रवार, १७ डिसेंबर २०२१



इचलकरंजी : विभागीय ॲथलेटिक्स स्पर्धेतील डीकेएएससी महाविद्यालयाच्या यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे.

## ‘डीकेएएससी’चे ॲथलेटिक्समध्ये यश

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयाने शिवाजी विद्यापीठाच्या विभागीय ॲथलेटिक्स स्पर्धेत उल्लेखनीय यश मिळवले. स्फूर्ती माने हिने उंच उडीत १.५५ मीटर उडी मारून सुवर्णपदक तर अनिकेत माने याने १.९५ मीटर उडी मारून सुवर्णपदक पटकावले. श्रुती कांबळे हिने रौप्यपदक तसेच चंद्रभागा नेर्ले व योगेश गडकरी याने हॅमर थ्रो प्रकारात सुवर्णपदक प्राप्त केले. ओंकार कुंभार याने ८०० मीटर धावणे स्पर्धेत रौप्यपदक, गुड्डी सिंग हिने भालाफेकमध्ये कास्यपदक मिळवले. खेळाडूंची शिवाजी विद्यापीठाच्या पुढील स्पर्धेसाठी निवड झाली आहे. प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्याहस्ते खेळाडूंचा सत्कार केला. खेळाडूंना प्रा. मेजर मोहन वीरकर, प्रा. मुजफ्फर लगीवाले, जयकुमार करके आदींचे मार्गदर्शन लाभले.

CS Scanned with CamScanner

दैनिक
महासत्ता

रविवार,
ता.१९ डिसेंबर २०२१

# वाणिज्य विभागाचा दिक्षा सत्र आरंभ कार्यक्रम संपन्न

**इचलकरंजी,ता.१८**

येथील डी.के.ए. एस.सी. कॉलेजमध्ये वाणिज्य विभागाचा दीक्षा सत्र आरंभ कार्यक्रम संपन्न झाला.या कार्यक्रमात प्रभारी प्राचार्य डॉ.व्ही.एस.ढेकळे यांनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक शिक्षणमहर्षी डॉ.बापूजी साळुंखे यांचे कार्य, संस्थेचे व्यवस्थापन तसेच महाविद्यालयाच्या कामकाजाची ओळख करून दिली.

या दीक्षा सत्र आरंभ कार्यक्रमात महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागाची ओळख (डॉ.रिता रॉड्रीक्स), वाड्मय मंडळ (डॉ.एकनाथ आळवेकर), राष्ट्रीय सेवा योजना (प्रा.अरुण कटकोळे), ग्रंथालय विभाग( ग्रंथपाल विजय यादव), सांस्कृतिक विभाग (डॉ.डी.सी.कांबळे), शिष्यवृत्ती योजना आणि स्पर्धा परीक्षा विभाग (डॉ.ए.पी.जाधव), विद्यापीठ परीक्षा (प्रा.डी.ए.यादव), लैंगिक छळ व महिला सबलीकरण (प्रा.सौ.ए.एम. उबाळे), एनसीसी व क्रिडा विभाग(प्रा.व्ही.एस.ढोबळे )यांनी आपापल्या विभागांची ओळख करून दिली.

कार्यक्रमाचे संयोजन आणि प्रास्ताविक प्रा. विजय पाटील यांनी केले. आभार प्रा.एम.एम.महाजन यांनी मानले तर सूत्रसंचालन प्रा.डॉ.सौ.एस. जे. वेल्हाळ यांनी केले. कार्यक्रमासाठी प्रथम वर्ष वाणिज्य विभागातील विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

Scanned with CamScanner

सकाळ
रविवार,
१९ डिसेंबर २०२१



इचलकरंजी : राज्यस्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत यश मिळवलेल्या डीकेएएससी महाविद्यालयातील खेळाडूंचा सत्कार करताना प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे.

# 'डीकेएएससी'च्या खेळाडूंची निवड

**इचलकरंजी :** राज्यस्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत डीकेएएससी महाविद्यालयाने यश मिळवले. रोहन काटकर याने ६१ किलो वजनी गटात एकूण २०७ किलो वजन उचलून राज्यात प्रथम क्रमांक मिळवला. संतोषी फातलेने ५५ किलो वजनी गटात प्रथम क्रमांक मिळवला. बुलढाणा येथे या राज्यस्तरीय सब ज्युनिअर वेटलिफ्टिंग स्पर्धा झाल्या. त्यांची ओडिसा येथे होणाऱ्या नॅशनल (राष्ट्रीय) स्पर्धेसाठी निवड झाली आहे. खेळाडूंचा प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांच्याहस्ते सत्कार केला. खेळाडूंना प्रा. मेजर मोहन विरकर, प्रा. मुजफ्फर लगीवाले, सुविचार परमाजे, जयकुमार करके यांचे मार्गदर्शन लाभले.

Scanned with CamScanner

मंगळवार, २१ डिसेंबर २०२१

तरुण भारत

# 'डीकेएएससी'मध्ये वाणिज्य विभागाचा दीक्षा सत्र आरंभ

**इचलकरंजी :** येथील डीकेएएससी कॉलेजमध्ये वाणिज्य विभागाचा दीक्षा सत्र आरंभ कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात प्रभारी प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे कार्य, संस्थेचे व्यवस्थापन तसेच महाविद्यालयाच्या कामकाजाची ओळख करून दिली. कार्यक्रमात महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागाची ओळख (डॉ. रिता रॉड्रीक्स), वाङ्मय मंडळ (डॉ. एकनाथ आळवेकर), राष्ट्रीय सेवा योजना (प्रा. अरुण कटकोळे), ग्रंथालय विभाग (ग्रंथपाल विजय यादव), सांस्कृतिक विभाग (डॉ. डी. सी. कांबळे), शिष्यवृत्ती योजना आणि स्पर्धा परीक्षा विभाग (डॉ. ए. पी. जाधव), विद्यापीठ परीक्षा (प्रा. डी. ए. यादव), लैंगिक छळ व महिला सबलीकरण (प्रा. सौ. ए. एम. उबाळे), एनसीसी व क्रिडा विभाग (प्रा. व्ही. एस. ढोबळे) यांनी विभागांची ओळख करून दिली. प्रास्ताविक प्रा. विजय पाटील यांनी केले. आभार प्रा. एम. एम. महाजन यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. सौ. एस. जे. वेल्हाळ यांनी केले. कार्यक्रमासाठी प्रथम वर्ष वाणिज्य विभागातील विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

Scanned with CamScanner

यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

## ए. एस. सी. कॉलेजमध्ये चर्चासत्र

**इचलकरंजी (पुढारी वृत्तसेवा) :** येथील डी. के. ए. एस. सी. कॉलेजमध्ये भौतिकशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित केलेले 'हवामान बदल : समस्या व आव्हाने' या विषयावरील चर्चासत्र झाले. या चर्चासत्रासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील उपस्थित होते. अध्यक्षस्थानी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सचिव प्राचार्या सौ. शुभांगी गावडे उपस्थित होत्या. भारतीय हवामानशास्त्र विभागातील शास्त्रज्ञ श्रीमती आरती बंडगर व रंजन फुकन हे वक्ते म्हणून उपस्थित होते. प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. विनायक गानबावले यांनी आभार मानले.

Scanned with CamScanner

सकाळ

बुधवार, २२ डिसेंबर २०२१

# 'डीकेएएससी'मध्ये भित्तीपत्रिकेचे उद्घाटन

**इचलकरंजी :** डीकेएएससी महाविद्यालयात गणित विभागाच्या भित्तीपत्रिकेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी केले. डॉ. ढेकळे यांनी गणित विषयाचे मानवी जीवनातील महत्त्व स्पष्ट केले. प्रास्ताविक प्रा. एस. टी. सुतार यांनी केले. प्रा. डी. जे. मुंगारे यांनी आभार मानले. प्रा. एम. एम. कांबळे, डॉ. व्ही. बी. गाणबावले, प्रा. वृषाली हत्तरगी, प्रा. सुप्रिया पाटील आदी उपस्थित होते.

CS Scanned with CamScanner

साप्ताहिक अमॅच्युअर दि. २३ डिसेंबर २०२१ ते २९ डिसेंबर २०२१

# शाश्वत विकासासाठी पर्यावरणातील हस्तक्षेप थांबविला पहिजे – प्रा. डॉ. पी. एस. पाटील

## 'डीकेएएससी'त हवामान बदल : समस्या व आव्हाने चर्चासत्र

गुणवत्ता हमी कक्ष व भौतिकशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित या चर्चासत्रासाठी प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलगुरु प्रा. डॉ. पी. एस. पाटील उपस्थित होते. अध्यक्षस्थानी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सचिवा प्राचार्या शुभांगी गावडे उपस्थित होत्या. भारतीय हवामान शास्त्र विभागातील शास्त्रज्ञ श्रीमती आरती बंडगर व रंजन फुकन हे प्रमुख वक्ता होते.

प्राचार्य डॉ. व्ही. एस. ढेकळे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. विनायक गानबावले यांनी आभार मानले. हवामान व पर्यावरण बदलामागची कारणे व त्याचा मानवी व इतर सर्व जीवांवर होणार परिणाम याविषयी चर्चा झाली.

सदरचे चर्चा सत्र ऑनलाइन व ऑफलाईन या मिश्र पद्धतीने आयोजित करण्यात आले. सादर चर्चासत्रात १५० विद्यार्थ्यांनी ऑफलाईन तर ५५ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने सहभाग नोंदविला.




Scanned with CamScanner